रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक ११३ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २१ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹

चिंचोटी येथील शेकापच्या महिला मेळाव्याला अलोट गर्दी






(छायाचित्र : अमोल नाईक)

# शिवबाची लेक परिवर्तनाची नांदी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पुरोगामी महाराष्ट्रामध्ये पुरोगामी विचारांची तलवार घेऊन, ज्योत घेऊन आम्हा सावित्रीच्या लेकींना पुढे जायचे आहे. बचत गट हे माध्यम आहे. मेळावा हे जनजागरण आहे. या मेळाव्यातून संघटन करुन आम्हाला आमच्या पोटातलं ओठात आणायचे आहे. आणि, ओठातलं बाहेर काढून आम्हाला समाजामध्ये परिवर्तन करायचे आहे. ते परिवर्तन, जे गोरगरीब जनतेला तिच्या जमिनीवरचे हक्क देतील, जे महिलेला तिचा हक्क आधारित योजना देतील आणि महिलेला विश्वास देतील, ज्यांना पाण्यावर अधिकार देतील आणि असलेल्या अधिकारांवरचे जे कायदे आहेत, त्या कायद्यांची स्त्रीवादी दृष्टीकोनातून त्याची अंमलबजावणी होईल, तिथेच खऱ्या अर्थाने आमच्या या बचत गटांच्या मेळाव्याचा उद्देश साध्य होईल, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी केले.

## सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांचे प्रतिपादन

शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने शुक्रवारी (दि. २०) महिलांसाठी रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशन पुरस्कृत 'लेक शिवबा'ची भव्य संवाद मेळावा, रामराज विभागातील चिंचोटी येथे आयोजित करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की, ही भूमी नारायण नागू पाटलांची आहे. ही भूमी आमच्या छत्रपती शिवाजी महाराजांची, ही भूमी जिजाऊंची आहे. हा महाराष्ट्र सावित्रीबाई फुलेंचा आहे. राजा छत्रपती शाहू महाराजांचा आहे. आपणा सर्व रणरागिणींना स्व. मीनाक्षी पाटील यांचा वारसा आहे. त्यामुळे आता भाकरी फिरवण्याची वेळ आलेली असून, पोटातील ओठावर आणण्याची वेळ आली आहे. आणि ओठातील आहे, ते सार्वजनिकरित्या बोलण्याची वेळ आलेली आहे. ती ताकद माझ्या रणरागिणींमध्ये आहे. यावेळी सरकारने मतांवर डोळा ठेवून विविध योजना सुरू केल्याचे सांगितले. परंतु, आमच्या या कष्टकरी माताभगिनी खऱ्या अर्थाने शिकलेल्या असून,

पान २ वर

## शेकाप तुमच्या सदैव पाठीशी : चित्रलेखा पाटील



महागाईच्या झळा महिलांना पोहोचत आहे. सिलिंडरचे दर वाढले आहेत. महिन्याचा आर्थिक ताळमेळ जुळवताना अनेक अडचणी निर्माण होत आहेत. सरकारने निवडणुका समोर ठेवून योजना सुरु केल्या आहेत. याचा विचार प्रत्येकाने करणे आवश्यक आहे. सध्या देशाची, राज्याची परिस्थिती भयावह आहे. सर्वसामान्यांना वेटीस धरण्याचे काम सरकार करत आहे. त्यामुळे आपल्या सर्वांना एकजुटीने संघर्ष व लढा देण्याची गरज आहे. शेकाप तुमच्या सर्वांच्या पाठीशी कायम राहील, असे प्रतिपादन शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केले.

यावेळी चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, सर्व महिला मेळाव्याच्या निमित्ताने एकत्र आल्याचा आनंद आहे. महिला स्वाभिमानाने जगल्या पाहिजे ही आमची भूमिका आहे. महिलांनी ठरवले तर काहीही करू शकतात. महिलांचे कोणतेही प्रश्न असोत, ते सोडवण्यासाठी कायमच प्रयत्नशील राहीन. खासदारकीच्या निवडणुकीत विरोधकांनी जिंकण्यासाठी

पान २ वर

---

**आजचा अग्रलेख**

भाऊबीजग्रस्तांचा टाहो

**वे|ध|क**

### अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**पनवेल :** तेरा वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी आरोपी फैय्याज महंमद शेख याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात पोकसोसह बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पीडित मुलगी पनवेल रेल्वे स्टेशन रोड परिसरात राहणारी असून, तिचे अपहरण केल्याप्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर त्या मुलीचा शोध घेतला असता तिने आरोपी फैय्याजने त्याच्या घरात नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याची माहिती पोलिसांना दिली. आरोपीला अद्याप अटक करण्यात आली नाही. याप्रकरणी महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक सुषमा पाटील अधिक तपास करत आहेत.

### तीन मुलांना विहिरीत ढकलले

**नाशिक :** सिन्नर तालुक्यात तीन शाळकरी मुलांना विहिरीत ढकलून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सिन्नर तालुक्यातील वडगाव पिंगळे येथील घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. याप्रकरणी एका संशयित आरोपीली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. संशयित अमोल लांडगे याने तिघा शाळकरी मुलांना शेजारच्या विहिरीत कासव असल्याचे सांगितले आणि विहिरीत ढकलून दिले. त्यातील एकाने विहिरीतील दोरीला पकडून स्वतः सावरत इतर दोघांचा जीव वाचवला. या प्रसंगातून वाचून घरी आल्यानंतर या मुलांनी घरी आई-वडिलांना संपूर्ण हकीकत सांगून पोलिसांत तक्रार दाखल केली.

### सिडकोच्या अध्यक्षपदी आ. संजय शिरसाट



**नवी मुंबई :** आ. संजय शिरसाट यांची सिडकोच्या अध्यक्षपदी वर्णी लावण्यात आली असून, त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार नुकताच स्वीकारला. याप्रसंगी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शांतनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले आणि मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे उपस्थित होते. सिडकोचे प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण करण्यावर आपला भर राहील, असे प्रतिपादन आ. शिरसाट यांनी केले.

पान २ वर

---

पोलीस भरती परीक्षा घोटाळा प्रकरण

## आणखी दहा आरोपींना अटक

। रायगड । खास प्रतिनिधी ।

जिल्ह्यामध्ये नुकतीच पोलीस भरती प्रक्रिया पार पडली होती. लेखी परीक्षेदरम्यान सहा उमेदवारांकडे इलेक्ट्रॉनिक ब्ल्यू टूथ डिवाईस मिळून आले होते. पोलिसांनी सहा जणांना अटक केली होती. यांना मदत करणाऱ्या दहा जणांचा छडा रायगड पोलिसांनी लावला असून, याप्रकरणी त्यांनी राज्याच्या विविध भागातून तब्बल दहा आरोपींना अटक केली आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

१० ऑगस्ट २०२४ रोजी रायगड जिल्ह्यात शिपाईच्या एकूण ३९१ पदांकरिता लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यापैकी अलिबाग

**रायगड पोलिसांची कामगिरी**

**अद्याप तपास सुरूच**




पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकूण सात परीक्षा केंद्रांवर एकूण पुरूष १९४० व महिला ११७५ तसेच पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील एकूण चार परीक्षा केंद्रांवर एकूण पुरूष १६३२ उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात आली होती.

**स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, रसायनी पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक संजय बांगर, स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि भास्कर जाधव, सपोनि संतोष आवटी, तसेच रायगड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक यांनी तपास केला. याकामी सायबर सेलचीदेखील त्यांना मदत मिळाली, अशी माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली. अद्याप याबाबतचा तपास सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.**

परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश करणाऱ्या परीक्षार्थी उमेदवारांची तपासणी करत असताना अलिबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील चार परीक्षा केंद्रांवर ५ व पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका परीक्षा केंद्रावर एक अशा एकूण सहा परीक्षार्थींच्या कानामध्ये इलेक्ट्रॉनिक ब्ल्यू टूथ डिवाईस मिळून आले होते. त्यामध्ये रामदास जनार्दन ढवळे (२३) रा. नाळवंडी, जि. बीड, दत्ता सुभाष ढेंबरे (२२) रा. मौजवाडी, जि. बीड, ईश्वर रतन जारवाल (२१) रा. अंबड, जि. जालना, गोरख गंगाधर गडदे (२४) रा. अंबेजोगाई, जि. बीड, सागर धरम सिंग जोनवाल (२०) रा. गंगापूर, जि. संभाजीनगर,

पान २ वर

## शिक्षिकेची चिमुकलीला मारहाण

- डोक्यात टोकदार पेनाचे घातले घाव
- घटनेच्या तीन दिवसांनंतरही शिक्षिका मोकाट
- उरण पोलिसांचे अक्षम्य दुर्लक्ष



। उरण । वार्ताहर ।

उरण तालुका पुन्हा एका जबरदस्त हादरला आहे. उरण-जासईमधील घरगुती शिकवणी घेणाऱ्या एका विकृत शिक्षिकेचा संतापजनक प्रताप समोर आला आहे.

नीता प्रकाश म्हात्रे असे या निर्दयी शिक्षिकेचे नाव असून, तिने एका पाच वर्षीय निरागस चिमुकलीचा अनन्वित छळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, पालकांनी मोठ्या विश्वासाने या शिक्षिकेकडे पाठवलेल्या चिमुरडीच्या डोक्यात नीता म्हात्रे हिने डोकदार पेन अनेकदा टोचून तिला रक्तबंबाळ केले. तसेच तिचे गाल आवळले आणि मारहाणदेखील केल्याचे चिमुकलीने सांगितले. तर, शिकवणीला येणाऱ्या इतर मुलांनीदेखील ही बाब मुलीच्या पालकांना सांगितली.

मुलीच्या डोक्यात पेन टोचल्याने तिच्या डोक्यातून रक्त

पान २ वर

---

## सीएनजी बस घाटरस्त्यात दमली

**डिझेल बस देण्याची नागरिकांची मागणी**



। महाड । प्रतिनिधी ।

महाड एसटी आगारामध्ये पूर्णतः सीएनजी बसेस दाखल झाल्या असून, या बसेस घाट मार्गावर सातत्याने बंद पडत असल्याची तक्रार किल्ले रायगड परिसरातील नागरिकांनी केली आहे. घाटातच बसेस बंद पडत असल्याने प्रवाशांचे आणि स्थानिक नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. याबाबत पूर्वीप्रमाणेच डिझेल बसेस देण्याची मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

महाड एसटी

पान २ वर

## सिलिंडरच्या स्फोटाने कळंबोली हादरली

- स्फोटाच्या दणक्याने परिसरातील नागरिक भीतीच्या छायेत
- अग्निशमन, पोलीस यंत्रणेकडून तपास कामाला वेग

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।



पालिका हद्दीतील कळंबोली गावातील एका रहिवासी संस्थेतील घरात सिलिंडरचा स्फोट झाल्याची घटना शुक्रवारी (दि.२०) घडली आहे. स्फोटामुळे आजूबाजूच्या घरांचे नुकसान झाले असून, सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश सृष्टी रहिवासी संस्थेतील सहाव्या मजल्यावर असलेल्या सी ६०१ क्रमांकाच्या घरात घरगुती वापराच्या गॅसचे तीन सिलिंडर ठेवण्यात आले होते. यापैकी एका गॅस सिलिंडरचा स्फोट झाला असून, या स्फोटाचा आवाज आजूबाजूला एक किलोमीटर अंतरापर्यंत ऐकू गेला आहे. स्फोटाच्या तीव्रतेमुळे गणेश सृष्टी इमारतीतील या घराची बाहेरील भिंत पूर्णपणे तुटली असून, तुटलेल्या भिंतीचे तुकडे आजूबाजूला उडून इमारतीशेजारील घरांचे यामुळे नुकसान झाले आहे. तसेच स्फोटात फुटलेल्या सिलिंडरचे तुकडेदेखील इमारतीखाली विखुरले आहेत. महत्त्वाचे म्हणजे, बंद असलेल्या या खोलीत झालेला हा स्फोट नक्की कशामुळे झाला, याबाबत माहिती मिळाली नसून, घटनेनंतर घटनास्थळी पोहोचलेले अग्निशमन दलाचे जवान आणि पोलीस अधिकारी स्फोट कशामुळे घडला याचा तपास करत आहेत.

## सर्वोच्च न्यायालयाचे यूट्यूब चॅनल हॅक

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नावाने पैसे मागितल्याचा प्रकार घडला होता. त्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाचे यूट्यूब चॅनल हॅक करण्यात आल्याची घटना घडली आहे. न्यायालयात झालेल्या सुनावणीचे व्हिडीओ गायब झाले असून, एका क्रिप्टोकरन्सीची जाहिरात दिसत आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून याबद्दल माहिती देण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयातील कामकाजाचे थेट प्रक्षेपण केले जाते. सर्वोच्च न्यायालयाचे अधिकृत यूट्यूब चॅनल असून, त्यावर सुनावणीचे व्हिडीओही अपलोड केले जातात. मात्र, अज्ञाताकडून हे चॅनल हॅक करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे तंत्रज्ञान विभागाच्या रजिस्टारकडून याबद्दल माहिती देण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीचा एकही व्हिडीओ यूट्यूब चॅनलवर दिसत नाही. एक व्हिडीओ प्ले होत असून, तो क्रिप्टोकरन्सी एक्सआरपीच्या जाहिरातीचा आहे. रिप्पल असे असे नाव दिसत असून, 'ब्रॅड गार्लिंगहाऊस : रिप्पल रिस्पॉन्ड्स टू द एसईसी २ बिलियन डॉलर फाईन. एक्सआरपी प्राइस प्रेडिक्शन'सर्वोच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठासमोर खटल्यांची सुनावण्यांचे या यूट्यूब चॅनलवरून थेट प्रक्षेपण केले जाते. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने सुनावण्यांचे थेट प्रक्षेपण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर पहिल्यांदाच असा प्रकार घडला आहे.

**पहिले प्रक्षेपण कधी?**

**माजी सीजेआय यूयू ललित यांच्या अध्यक्षतेखालील पूर्ण न्यायालयाच्या बैठकीत मुख्य खटल्यांचे थेट प्रसारण करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला होता. या अंतर्गत, सर्वोच्च न्यायालयाने २०१८ मध्ये असा निर्णय घेतला की, सर्व घटनापीठांच्या सुनावणी यूट्यूब चॅनेलवर थेट प्रसारित केल्या जातील.**

**२७ सप्टेंबर २०२२ ला सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजाचे पहिले थेट करण्यात आले होते.**

---

१५ सदस्यांच्या राजीनाम्यास दोन महिने पूर्ण

## जिल्हा प्रशासनाचा वेळकाढूपणा उघड

। नेरळ । प्रतिनिधी ।

**कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीमधील सरपंच वगळता अन्य सर्व १५ सदस्यांनी १८ जुलै २०२४ मध्ये राजीनामे दिले. त्यानंतर त्या राजीनामा पत्रांची पडताळणी होऊन राजीनामे मंजूरदेखील करण्यात आले. मात्र, दोन महिने उलटूनदेखील नेरळ ग्रामपंचायत बरखास्त झाली नाही. जिल्हा प्रशासनाच्या वेळकाढूपणामुळे नेरळ गावामध्ये मागील दोन महिन्यांपासून ग्रामपंचायतीमध्ये एकमेव सदस्य असलेल्या सरपंचांच्या माध्यमातून गावाचा कारभार हाकला जात आहे.**



- अद्याप नेरळ ग्रामपंचायत बरखास्तीचे आदेश नाहीत

नेरळ ग्रामपंचायतीमधील १६ पैकी १५ सदस्यांनी १८ जुलै रोजी सरपंच उषा पारधी यांच्या कारभाराला कंटाळून राजीनामा दिला आहे. त्यानंतर २९ जुलै रोजी सर्व राजीनामा पत्रांची पडताळणी झाली आणि राजीनामे मंजूर झाले. मात्र, त्यानंतर पुढील सात दिवस हे राजीनामे देणारे सदस्य हरकत घेऊन न्यायालयात जाऊ शकतात आणि त्यासाठी मुदत असते. ही मुदत चार ऑगस्ट रोजी संपली आणि त्यानंतर संबंधित सर्व अहवाल कर्जत पंचायत समितीला ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून सादर करण्यात आला. या अहवालावर आपले पत्र जोडून कर्जत पंचायत समिती गटविकास अधिकारी यांनी अहवाल रायगड जिल्हा परिषदेकडे पाठवायचा असतो. गटविकास अधिकारी यांचा अहवाल ७ ऑगस्ट रोजी रायगड जिल्हा परिषदेकडे पोहोचला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत बरखास्त करण्याची पुढील कार्यवाही जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात पोहोचण्यास तब्बल सव्वा महिना लागला असल्याची माहिती मिळत आहे. रायगड जिल्हा परिषदेने नेरळ ग्रामपंचायतीमधील सदस्यांच्या राजीनामा पत्राचा अहवाल सादर करायला एवढे दिवस का लावले, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

राजीनामा देणाऱ्या सदस्यांचा कालावधी साधारण दोन महिन्यांचा मागे गेला आहे. आजपर्यंत नेरळ ग्रामपंचायत बरखास्त होण्याचा

पान २ वर

### २३ सप्टेंबर रोजी सुनावणी

**कोकण आयुक्त कार्यालयात सुनावणी घेण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे यांचे अहवाल रायगड जिल्हाधिकारी आणि रायगड जिल्हा परिषद यांच्याकडून येण्यास उशीर लागला आहे. त्यामुळे तब्बल सव्वा दोन महिन्यांनी नेरळ ग्रामपंचायतीमधील राजीनामा पत्रावर निर्णय होण्याची शक्यता आहे.**



## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ सप्टेंबर

१) श्रीम. प्रगती चिंतामण वर्तक
दळीनगर, वेश्वी, २१-९-१९४९
२) श्री.श्रीकृष्ण भिमाजी थळे
मु.गोंधळपाडा, २१-९-१९४३
३)श्री.मनोहर कृष्ण भगत
मु.स्वा.समर्थ नगर, अलिबाग २१-९-१९४९
४)श्री.विलास हरिभाऊ गंभीर
बाजारपेठ, अलिबाग २१-९-१९५१
५)श्रीम.सुप्रिया सुरेश पाटोळे
वरसोली, अलिबाग २१-९-१९५१
६)श्री.राजन बाळकृष्ण नाईक
मु.वरसोली, अलिबाग २१-९-१९५४

# उरण-करंजा रस्ता मृत्यूचा सापळा

## अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी



**। उरण । वार्ताहर ।**
**उरण-करंजा रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या रस्त्यावरून वाहन घेऊन जाणे जिकिरीचे बनले आहे. या रस्त्यावरून क्षमतेपेक्षा अधिक वजनाची अवजड वाहने ये-जा करीत आहेत. याबाबत अधिकारी वर्गाकडे वारंवार तक्रारी करूनही ते ठेकेदाराशी असलेल्या आर्थिक साटेलोटामुळे याकडे दुर्लक्ष करीत आहेत, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.**

काही दिवसांपूर्वी एका २० वर्षीय तरुणीचा अपघाती मृत्यू झाला आहे. सदरचा रस्ता हा मृत्यूचा सापळा बनला आहे. उरण-करंजा रस्त्याच्या दुरावस्थेला प्रामुख्याने शासकीय अधिकारी वर्गच जबाबदार आहेत. त्यांनी याकडे वेळीच लक्ष दिले असते तर तरुणीचा बळी गेला नसता. याकडे लक्ष दिले नाहीतर अनेक अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याला सर्वस्वी जबाबदार शासकीय अधिकारी वर्गाला धरून त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. उरण-करंजा रस्ता मृत्यूचा सापळा बनला असल्याची संतप्त प्रतिक्रिया जनमानसात उमटत आहे.



## गणपती सजावट स्पर्धेत कल्पेश चवरकर विजेता

**। गडब । वार्ताहर ।**
गडब सरपंच मानसी मंगेश पाटील व साईराम सेवा मंडळ गडब चिर्बी यांच्या विद्यमाने काराव-गडब ग्रामपंचायत क्षेत्रातील घरगुती गणपती सजावट स्पर्धेत प्रथम क्रमांक कल्पेश चवरकर (मौजे), द्वितीय क्रमांक मितेश ठाकूर (ढोंबी), प्रवीण पाटील (देवकी नगर), प्रतिक शिर्के (कारावी), उत्तेजनार्थ शुभम पाटील (खारघाट), शंशाक पाटीला (खारघाट), अलंकार पाटील (चिर्बी), संदीप शिर्के (कारावी), प्रफुल्ल कोठेकर (मांचेळा), स्वप्निल जांभुळकर (मौजे) विजेत्या स्पर्धकांना सरपंच मानसी पाटील व साईराम सेवा मंडळाचे पदाधिकारी यांच्या हस्ते पारितोषक देऊन सन्मानित केले.

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री राहणार उपस्थित

## रविवारी कोळी भवनाचे भूमीपूजन

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**
कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. आमदार रमेशदादा पाटील यांच्या संकल्पनेतून ऐरोली, नवी मुंबई येथे उभारण्यात येणाऱ्या कोळी भवन या नवीन वास्तूचा भूमीपूजन समारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तसेच इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत दि. २२ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता ऐरोली, नवी मुंबई येथे होणार आहे.

याबाबत माहिती देताना रमेश पाटील यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून नोकरी, शिक्षण, हॉस्पिटल अशा विविध कामानिमित्त मुंबई शहरात येणाऱ्या सर्वसामान्य आदिवासी कोळी व मच्छिमार बांधवांकरिता आणि विविध स्पर्धांच्या तयारीकरिता ग्रामीण भागातून येणाऱ्या कोळी समाजातील युवक-युवतींना राहण्याची सोय व्हावी, त्याचप्रमाणे नवी मुंबईतील भूमीपुत्र-प्रकल्पग्रस्त, कोळी-आगरी बांधवांच्या सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांकरिता कोळी महासंघाच्या माध्यमातून रु. २० कोटी खर्च करून नवी मुंबई येथे भव्य असे कोळी भवन उभारण्यात येत आहे. तसेच या नवीन वास्तूचा भूमीपूजन समारंभ राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते संपन्न होणार असल्याचे सांगितले. तसेच या सुवर्ण क्षणाचे साक्षीदार होण्याकरिता राज्यातील सर्व आदिवासी कोळी व मच्छिमार बांधवांनी आणि नवी मुंबईतील भूमीपुत्र-प्रकल्पग्रस्त, कोळी-आगरी बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**कै. श्री. शरद गजानन रानवडे, स्मरणार्थ, चेंढरे, अलिबाग**

**श्री. ह.र. अधटराव, स्मरणार्थ अलिबाग**
**कै. हिराबाई मारुती खोत स्मरणार्थ अलिबाग**
**श्री. प्रशांत आहेर, वाढदिवस, नाशिक**

## नगरपंचायत तळा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने काढली स्वच्छता रॅली




**। तळा । वार्ताहर ।**
नगरपंचायत आणि कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा यांच्या संयुक्त विद्यमाने १९ सप्टेंबर रोजी स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली तळा कनिष्ठ महाविद्यालय, मुळे हॉटेल कॉर्नर, तांबट आळी, नगरपंचायत, बाजारपेठ ते परत कनिष्ठ महाविद्यालय अशी काढण्यात आली.

या रॅलीमध्ये तळा नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी मनीषा वजाळे, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, ॲड. निलेश रातवडकर, तळा नगरपंचायतीचे कार्यालय अधीक्षक संदेश मांगडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. बी.एन. दयानेकर, प्रा. एन.सी. पाटील, प्रा. बी.एस. कुळकर्णी, प्रा. एल.आर. गायकवाड, प्रा. डी.टी. आंबेगावे व विद्यार्थी सहभागी झाले होते. यादरम्यान नगरपंचायत तळा येथे मुख्याधिकारी मनीषा वजाळे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. या रॅलीदरम्यान स्वच्छ भारत-आदर्श भारत, स्वच्छ तळा-सुंदर तळा आदी घोषणा देण्यात आल्या. स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण यांच्या संयुक्त विद्यमानाने महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून दि. २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने स्वच्छता ही सेवा मोहीम दि. १७ सप्टेंबर २०२४ ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

यावर्षीच्या स्वच्छता ही सेवा २०२४ साठी स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता ही थीम निश्चित केली आहे. या अनुषंगाने तळा नगरपंचायत आणि कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.




### जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग स्पर्धा

## सई वावेकर, सार्थक कासारचे उज्ज्वल यश

**। तळा । वार्ताहर ।**
गोपीनाथ महादेव वेदक विद्या मंदिर तळाचे रायगड जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी सई वावेकर हिने यश मिळवले असून, मानाचा तुरा रोवला आहे. त्याचबरोबर वेदक विद्यामंदिरचे नांव मोठे केले आहे. महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या रायगड जिल्हास्तरीय इनलाईन रोलर स्केटिंग स्पर्धेत सईने १४ वर्षे वयोगट मुली इनलाइन रोलर स्केटिंग या क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक आणि सार्थक राकेश कासार इयत्ता दहावी याने १७ वर्षे वयोगट मुलगे इनलाइन रोलर स्केटिंग या क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक संपादन केला आहे. दोन्ही विद्यार्थीचे मुंबई विभागाच्या होणाऱ्या विभागीय स्पर्धेकरिता पात्र झाले आहेत. दोन्ही यशवंत गुणवंत स्पर्धकांचे विविध स्तरांवर हार्दिक अभिनंदन व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

सिडको
शहरांचे शिल्पकार

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांकरिता जाहीर सूचना**

सिडकोतर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांना महाराष्ट्र शासनाने २२.५% योजने अंतर्गत मंजूर केलेले सर्वोत्तम पुनर्वसन पॅकेज देण्यात आलेले आहे. विमानतळ प्रकल्पबाधितांना येणाऱ्या काळात नवी मुंबईमध्ये खासगी क्षेत्रात निर्माण होणाऱ्या रोजगारविषयक संधींचा लाभ घेता यावा याकरिता त्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन सक्षम बनविण्याचे सिडकोचे उद्दिष्ट आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधितांसाठी अभ्यासक्रम राबविण्याकरिता "सक्षम" कौशल्य विकास केंद्राच्या उभारणीची घोषणा सिडकोतर्फे करण्यात येत आहे. सदर अभ्यासक्रम हे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र शासन यांच्या अधिकृत केंद्रामार्फत राबविण्यात येणार आहेत. या संदर्भातील अद्ययावत माहिती, अर्ज व नोंदणी करण्याकरिता कृपया **https://cidco.maharashtra.gov.in/navi_mumbai_airport#gsc.tab=0** या लिंकचे अनुसरण करा. सदर लिंक दि. २५ सप्टेंबर २०२४ पासून उपलब्ध होणार आहे. लिंक वापरताना अडचण येत असल्यास **सिडको तारा प्रशिक्षण केंद्र, पहिला मजला, टॉवर क्र.५, सीबीडी बेलापूर रेल्वे स्थानक, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४** येथील सुविधा केंद्रास २५ सप्टेंबर २०२४ नंतर सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० या वेळेत भेट द्यावी.

**गीता अजित पिल्लई**
**मुख्य महाव्यवस्थापक**
**(परिवहन व विमानतळ)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२३८/२०२४-२५

## पान १ वरून

## शिवबाची लेक परिवर्तनाची नांदी

सुजाण व हुशार आहे. त्या आमच्यासरख्या शिकलेल्या बायकांपेक्षा दहा पावले पुढे असल्याने सरकारच्या भूलथापांना बळी पडणार नसल्याचा विश्वासही वैशाली पाटील यांनी व्यक्त केला. महिलांना ५० टके आरक्षण मिळाले तरीदेखील चित्र काही फारसे बदलले नाही. हे चित्र बदलण्याची क्षमता फक्त पुरोगामी विचाराच्या शेतकरी कामगार पक्षात आहे. आता अन्यायाविरोधात बोलण्याची, लढा देण्याची वेळ आली आहे.

यावेळी डॉ. वैशाली पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, रायगड जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, माजी नगरसेवक वृषाली ठोसर, देवायनी पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती विद्या म्हात्रे, प्रिया पेढवी, अश्लेषा नाईक, आक्षीच्या सरपंच रश्मी पाटील, नीरजा नाईक, रश्मी वाळंज, ॲड. नेहा राऊत, विक्रांत वार्डे आदी मान्यवर, तसेच ग्रामपंचायत बोरघर, रामराज, चिंचोटी, सुडकोली, बेलोशी येथील शेकाप कार्यकर्ते, महिला उपस्थित होत्या.

### शेकाप तुमच्या सदैव पाठीशी : चित्रलेखा पाटील

**पैशाचा पाऊस पाडला. पण, या भागातील महिला कार्यकर्त्या पैशासमोर झुकल्या नाहीत. त्या आपल्या भूमिकेशी ठाम राहिल्या. या निवडणुकीत रामराज विभागातील मतदार, कार्यकर्ते व महिलांनी गीते यांना बहुमत दिले.**

**छत्रपती शिवाजी महाराज दिल्लीसमोर कधीच झुकले नाहीत. पण, सत्तेसाठी आजचे राज्यकर्ते मोदी, शाहांसमोर झुकले, ही मोठी शोकांतिका आहे. शेतकरी कामगार पक्ष हा शेवटच्या घटकांपर्यंत काम करणारा पक्ष आहे. तळागाळातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी कायमच शेकाप कटिबद्ध आहे. या विभागाने शेकापसह आपले नेते जयंत पाटील यांच्यावर अमाप प्रेम केले. हे प्रेम असेच कायम राहू द्या. आपल्याकडील पाण्याचा व रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध राहीन. शेतकरी कामगार पक्षच रोजगार देणारा पक्ष आहे. प्रत्येक गावातील अनेकांना नोकऱ्या देण्याचे काम शेकापने केले आहे. ज्याप्रमाणे उमटे धरणातील गाळ काढून पाण्याचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे, त्याप्रमाणे या भागातील पाण्याचा प्रश्न सोडवणार, असा विश्वास चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.**

### महिला सुरक्षिततेसाठी एकजूट महत्त्वाची : ॲड. मानसी म्हात्रे




**आज निसर्गरम्य परिसरात पाच ग्रामपंचापतींच्या पंचक्रोशीत तुम्हा सर्वांच्या साक्षीने हा महिलांसाठी बचत गट मेळावा आयोजित करण्यात आला आहे. ३० वर्षांपासून गोरगरीब, मागास महिलांसाठी वैशाली पाटील काम करत आहेत. त्यांचा प्रवास आपल्या पक्षाचे दत्ता पाटील, प्रभाकर पाटील यांच्या कालखंडात झाला आहे. सरकारने अनेक योजना आणल्या. परंतु, जोपर्यंत आपण महिला सक्षम होण्यासाठी ठरवत नाही. मला कोणावर अवलंबून राहायचं नाही. ही भूमिका आपण घेतली पाहिजे. तू सुरक्षित नाही, हे काही मालिकांच्या माध्यमातून दाखवले जाते. असुरक्षिततेची भीती निर्माण केली जाते. महिला अत्याचारांच्या घटना झपाट्याने वाढत आहेत. समाजाचा विकास होत असताना महिलांची सुरक्षितता धोक्यात येऊ लागली आहे. अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. शासन सक्षम का नाही. जर सक्षम नसेल, तर सुरक्षिततेसाठी एकजूट होण्याचा निर्धार करुया. आजच्या मेळाव्याची टॅगलाईन लेक शिवबाची आहे. मरावे ते शिवबासारखे आणि जगावे ते जिजाऊसारखे या भूमिकेतून महिलांनी सक्षम होणे आवश्यक आहे.**

## शिक्षिकेची चिमुकलीला मारहाण

येऊ लागले. ते मुलीच्या पालकांना दिसू नये म्हणून नीता म्हात्रे या चलाख शिक्षिकेने मुलीचे केसदेखील धुतले आणि हा प्रकार आई-बाबांना सांगायचा नाही, अशी जबर धमकी दिली. मुलीचे केस ओले असल्याचे आढळल्याने आईने मुलीकडे चौकशी केली असता नीता म्हात्रे या क्रूर शिक्षिकेचा प्रताप समोर आला.

त्यानंतर मुलीच्या पालकांनी लागलीच उरण पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि घडलेला प्रकार सांगितला. मात्र, उरण पोलिसांनी आपल्या परंपरेनुसार या प्रकारणांकडेही हेतुपूर्वक दुर्लक्ष केल्याचे पालकांनी सांगितले. अद्यापही कोणत्याही प्रकारची कारवाई या निर्दयी शिक्षिकेकेवर झाली नसून, ती मोकाट फिरत असल्याचे समजते. महिला आणि मुलींच्या बाबतीत उरण पोलीस कधी गंभीर होतील? हा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

आज आपल्या पाल्यासोबत झालेली संतापजनक घटना उद्या इतरांच्याही निरागस मुलांसोबत घडू शकते म्हणून नीता म्हात्रे या शिक्षिकेवर कठोरात कठोर कारवाई करावी, तिचे क्लासेस बंद करून टाकावेत, अशी मागणी मुलीच्या पालकांसह परिसरातील संतप्त नागरिकांनी केली आहे.

## आणखी दहा आरोपींना अटक

शेखर बाबासाहेब कोरडे (२७) रा. नाळवंडी, जि. बीड यांचा समावेश होता.

राज्यात याआधी पोलीस भरती परीक्षेत असे प्रकार समोर आले होते. याचा खोलवर तपास करण्याचे आदेश कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, रसायनी पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक संजय बांगर, स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि भास्कर जाधव, सपोनि संतोष आवटी, तसेच रायगड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक यांनी तपास केला. याकामी सायबर सेलचीदेखील त्यांना मदत मिळाली.

पवन त्रंबक बमनावत (२५) रा. नळणी, जि. जालना, नारायण निवृत्ती राऊत (२९) रा. नाळवंडी, जि. बीड, प्रताप उर्फ भावड्या शिवसिंग गोमलाडू (२५) रा. वैजापूर, जि. छ. संभाजीनगर, कुमारी नागम्मा हनुमंत इबीटदार (२०) रा. देगलूर, जि. नांदेड, अर्जुन नारायण बेडवाल (२४) रा. परसोडा, जि. छ. संभाजीनगर, मंगेश बालाजी चोले उर्फ चोरमले सर (३४) रा. जळकोट, लातूर, संतोष सांडू गुसिंगे (३०) रा. पैठण, जि. छ. संभाजीनगर, कुमारी पूनम राम वाणी (२३) रा. पडेगाव, जि. छ. संभाजीनगर, जीवन मानसिंग नायमने उर्फ एस. राठोड उर्फ करण जाधव, रा. जोडवाडी, जि. छ. संभाजीनगर, जालींदर श्रीराम काळे (३२) रा. नाळवंडी, जि. बीड अशी अटक करण्यात आलेल्या दहा आरोपींची नावे आहेत. अद्याप अन्य आरोपींचा शोध सुरु आहे.

## सीएनजी बस घाटातच पडताहेत बंद

आगारातील जुन्या डिझेल बसेस मोडीत काढल्या आहेत. सध्या सीएनजीवर चालणाऱ्या बसेस दाखल झाल्या असून, सध्या महाड एसटी आगाराला सर्व सीएनजी बसेस उपलब्ध झाल्या आहेत. महाड तालुक्याचा बहुतांश भाग हा घाट मार्ग आहे. अनेक गावे दरी-डोंगरामध्ये वसलेली आहेत. रस्तेदेखील अरुंद आणि उंच घाटमाथ्याचे आहेत. यामुळे सीएनजी बसेस चढताना समस्या उद्भवत आहेत. अनेक वेळा गाडी चढावरील वळणावरच बंद पडत आहेत. यामुळे अन्य ये-जा करणाऱ्या वाहनांची अडचण होत आहे. शिवाय, गाडीतील प्रवाशांनादेखील अनेक वेळा पायी जाण्याची वेळ येत आहे. किल्ले रायगड परिसरात असलेल्या रायगड आणि सांदोशी या ठिकाणी जाणाऱ्या बसेस कोंझर घाट आणि सांदोशी घाट मार्गावर अनेक वेळा एसटी बसेस बंद पडल्यामुळे नागरिकांना तसेच प्रवाशांना त्रास सहन करावा लागला आहे. दोन बसेसमधून शालेय विद्यार्थींदेखील प्रवास करतात. या विद्यार्थ्यांनादेखील पायी चालत जाण्याची वेळ येत आहे. यापूर्वी सुरू असलेल्या डिझेलवरील गाड्या या घाट मार्गावर कधीच बंद पडत नव्हत्या. मात्र, सध्या अस्तित्वात असलेल्या सीएनजी बसेस सातत्याने बंद पडत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

शिवसेना पक्षाचे पाचाड वाळण उपविभाग प्रमुख बाळकृष्ण जाधव यांनी याबाबत सांगताना सीएनजी बसेस सातत्याने बंद पडत असल्याने ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागतो. मात्र, केलेल्या तक्रारीकडे एसटी महामंडळाचे अधिकारी दुर्लक्ष करत आहेत. याबाबत बाळकृष्ण जाधव यांनी या मार्गावर सीएनजी बसेसऐवजी डिझेल बसेस सुरू केल्या जाव्या, अशी मागणी करणारे निवेदन महाड एसटी आगाराचे आगारप्रमुख फुलपगारे यांना दिले आहे.

## जिल्हा प्रशासनाचा वेळकाढूपणा उघड

आदेश जिल्हा परिषदेने पारित करण्याची गरज होती. तीच रायगड जिल्हा परिषद आता नेरळ ग्रामपंचायतीचा कारभार एकमेव सदस्य असलेल्या सरपंचांकडून करून घेताना दिसत आहे. रायगड जिल्हा परिषदेचे आशीर्वाद नेरळ ग्रामपंचायत सरपंच यांना आहेत काय, असा सवाल नेरळ ग्रामस्थ विचारात आहेत. सर्व सदस्यांचे राजीनामे झालेले असताना एकमेव सरपंच कारभार हाकत असून, त्यांना जिल्हा परिषद पाठिंबा देत आहे काय, असा सवालदेखील उपस्थित होत आहे. कोकण आयुक्त कार्यालयात आता २३ सप्टेंबर रोजी नेरळ ग्रामपंचायतीच्या सरपंच आणि सदस्य या विषयवार सुनावणी होणार आहे. कदाचित त्याच दिवशी नेरळ ग्रामपंचायत बरखास्तीबाबत निर्णय होऊ शकतो, अशी माहिती समोर येत आहे.

## सिडकोच्या अध्यक्षपदी आ. संजय शिरसाट

याप्रसंगी नवनियुक्त अध्यक्ष आ. संजय शिरसाट यांनी, राज्याच्या विकासामध्ये सिडकोने आजवर महत्त्वाची भूमिका बजावली आहे. नगर नियोजन व विकास क्षेत्रातील अग्रगण्य प्राधिकरण ही सिडकोची ओळख कायम ठेवण्यासह सिडको विकसित करत असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नैना शहर, महागृहनिर्माण योजना इ. महत्त्वाकांक्षी प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण करण्यावर आपला भर असणार आहे. त्याचप्रमाणे, नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय घेण्यासही आपले प्राधान्य असणार आहे. सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्याचे सिडकोचे उद्दिष्ट लवकरात लवकर पूर्ण होणार आहे, असे उद्गार काढले.

**अलिबाग नगरपरिषद**
**बांधकाम विभाग जाहिर निविदा सूचना**
**सन. २०२४-२५**

अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील काम करण्यासाठी सिलबंद निविदा मान्यताप्राप्त व सक्षम पात्रता असलेल्या पालिकेच्या विषयीच्या अटी व शर्तीची पूर्तता करीत असलेल्या कंत्राटदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | कोऱ्या निविदा पत्रकाची किंमत | काम पूर्ण करण्याची मुदत | ठेकेदाराची पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अलिबाग नगरपरिषद हद्दीतील नंदा सावंत यांचे घराजवळ कॉंक्रीट सीसी रस्त्याचे बांधकाम करणे. | रु.६,५७,८०३/- रु. | ६,५७८/- | रु.५००/ | ९० दिवस | सार्वजनीक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत असलेला |

कोऱ्या निविदा नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि.२१/०९/२०२४ पासून दि. २७/०९/२०२४ पर्यंत दुपारी १.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळता देण्यांत येतील. प्रत्येक कामाच्या सिलबंद निविदेसोबत रोख स्वरुपात इसारा रक्कम भरल्याची मूळ पावती बंद लिफाफयात भरून जोडण्याची असून प्रत्येक कामाची सिलबंद निविदा दिनांक २७/०९/२०२४ रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळता सादर करण्याची आहे. मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. शक्य झाल्यास निविदा त्याच दिवशी म्हणजेच दिनांक २७/०९/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मा. मुख्याधिकारी यांचे दालनात निविदाधारक उपस्थित असलेस त्यांचे समोर उघडण्यात येतील. अपुऱ्या अगर चुकीची माहिती भरलेल्या निविदा तसेच निविदेमध्ये खाडाखोड केलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाही. तसेच नगरपरिषद कार्यालयात बांधकाम विभागात कोरे निविदा फॉर्म मिळतील. कोणतेही एक किंवा सर्व निविदा पत्रके कारण न दाखविता नाकारण्याच्या अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

सही /-
**प्रशासक तथा मुख्याधिकारी,**
**अलिबाग नगरपरिषद**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :- 7000033412**<br>**Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-12/24-25**<br>SRM Tender for Repairing of 33kV Current Transformers (CTs) / Potential Transformers (PTs) at 400kV RS, Kharghar. |
| 2 | Online Downloading the RFx | **19.09.2024, 18:00 Hrs. to 26.09.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the | **On or Before 26.09.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **27.09.2024. at 11:00 hrs.(if Possible)** |
| 5 | Tender amount | **Rs 5,68,440 /-** |
| 6 | EMD amount | **1% of Estimated cost** |
| 7 | Tender fees | **Rs 500/- + GST** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** 1.The Executive Engineer, : Mobile No. 8275215120.
2. Dy. Executive Engineer (O),: Mobile No 9769213899
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM ETenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER , 400KV RS (O&M) DN KHARGHAR**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tender -25 **(RFX.7000031554)** | Rfx e-tender for work of monkey patrolling with top video shooting of 220kV & 100kV Critical lines under EHV Lines S/Dn Panvel under EHV (O&M) Division Panvel. ….**2nd call.** **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Limited to Rs.25,00,000/-** |
| Tender -27 **(RFX.7000031714)** | RFx e-tender for AMC for work of repairs of 220kV Isolator, 100kV Isolator and 22kV Isolator and cable termination and joints at various substation under EHV (O&M) Division Panvel… **2nd call.** **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Limited to Rs.15,00,000/-** |

EMD 1% of estimated cost for each Tender. **Submission of bids from 20.09.2024 to 26.09.2024 up to 23:59 hrs, Opening date:-27.09.2024 @ 11:00 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The ADDL. Executive Engineer (O) Tel No. 022-27465410, Mob. No. 8530095666 E-mail ID ee7210@mahatransco.in

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER, EHV(O&M) DN PANVEL**

# आदिवासींचा सरकारविरोधात एल्गार

***विविध मागण्यांचा शासन दरबारी निर्णय होत नसल्याचा निषेध * रायगडसह राज्यभर बेमुदत निर्णायक आंदोलन**

**। पनवेल । वार्ताहर ।**

आदिवासींचा विविध मागण्यांचा शासन दरबारी निर्णय होत नसल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी (दि.२०) पनवेलसह रायगड जिल्हा, पालघर, ठाणे, नाशिक या ठिकाणी बेमुदत निर्णायक आंदोलन श्रमजीवी संघटना महाराष्ट्रचे अध्यक्ष रामाभाऊ वारणा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध ठिकाणी छेडण्यात आले होते.



आदिवासी बांधवांचे अनेक मूलभूत हक्कांचे प्रश्न देश स्वतंत्र होऊन ७७ वर्षांनंतरही प्रलंबित आहेत. त्यांचा रोजगार, पिण्याचे पाणी, गावठाण, घराखालील जागा, जातीचा दाखला, रेशनिंग, शिक्षण, आरोग्य तसेच अनुसूचित जमाती व अन्य पारंपरिक वनहक्काची मान्यता, तसेच 'हर घर नल से जल' पाणी योजना यासंदर्भात या बांधवांना नेहमीच डावलण्यात येते. तसेच, त्यांना हक्काच्या योजना मिळत नसल्याने हे आंदोलन ठिकठिकाणी छेडण्यात आले होते.

पनवेल येथील आंदोलन श्रमजीवी संघटना रायगड सरचिटणीस बाळाराम भोईर, जिल्हाध्यक्ष हिरामण नाईक, सरपंच कुंदा पवार, आदिवासी संघटनेचे नेते गणपत वारगडा आदींच्या मार्गदर्शनाखाली छेडण्यात आले हाते. जर शासनाने याची वेळीच दखल घेतली नाही तर येत्या सोमवारी (दि.२३) रायगडसह नाशिक, ठाणे, पालघर जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती कार्यालयात हे आदिवासी बांधव ठिय्या मांडून बसणार आहेत. तसेच, बुधवारी (दि.२५) हजारो आदिवासी बांधव त्या-त्या ठिकाणावरुन पायी मंत्रालयाकडे धडक देऊन संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षी आपला अधिकार मिळविण्याकरिता अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अशा पद्धतीचे मुक्कामी आंदोलन छेडणार असल्याची माहिती सरचिटणीस बाळाराम भोईर यांनी दिली यावेळी बोलताना दिली आहे.

# रोहा-कोलाड मार्गावर मोकाट गुरांचा सुळसुळाट

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा-कोलाड अंतर्गत राज्य मार्गावर मोठ्या प्रमाणावर मोकाट गुरे रस्त्याच्या मधोमध बसलेले आढळून येत असल्याने व सैरभैर फिरत असल्याने प्रवासी वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. या प्रकारामुळे स्थानिक ग्रामस्थ, वाहन चालकांसह प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जीवाला धोका निर्माण झाला आहे.



मोकाट गुरे ही गावातील एखाद्या रिकाम्या घराच्या व्हरांड्याला किंवा पडवीत राहून त्याचे गोठ्यात रूपांतर करतात. तरीदेखील गुरांचे मालक निवांतपणे राहून या समस्येवर काहीच उपाययोजना करत नाही. या मोकाट गुरांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीही निर्माण होत आहे. काही वेळा वाहन चालकांच्या घाईगडबडीमुळे अपघात झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. यातच जर दुर्दैवाने एखाद्या गुराचा अपघात झालाच, तर मालकवर्ग भरपाई मिळावी म्हणून धावत पळत येतो; परंतु आपल्या गुरांमुळे एखाद्याचे अपघातामध्ये दुखापत झाली तर गुरांचा मालक जवळसुध्दा फिरकत नसल्याने अनेकदा समोर आले आहे.

अशा मोकाट गुरांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी संबंधित प्रशासनाच्या माध्यमातून कडक पावले उचलून योग्य ती कारवाई करण्याची मागणी आता प्रवासी व वाहनचालक यांच्याकडून केली जाऊ लागली आहे.

# सुतारवाडी नाक्यावर भटक्या कुत्र्यांची दहशत

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

सुतारवाडी नाक्यावर भटक्या कुत्र्यांचा घोळका सातत्याने फिरत असून, यामध्ये काही कुत्रे अत्यंत खराब झालेले आहेत. सुतारवाडी बसथांब्यावर सकाळी कॉलेजला जाणारे पंचक्रोशीतील अनेक विद्यार्थी येत असतात. त्यांना भटक्या कुत्र्यांचा त्रास होऊ शकतो. अनेक ठिकाणी या प्राण्यांनी मुलांना चावा घेऊन घायाळ केल्याच्या घटना घडल्या आहेत. एखाडा पिसाळलेला कुत्रा जर चावला तर भयानक प्रसंग ओढवण्याची शक्यता आहे.



यामुळे या भटक्या कुत्र्यांचा वेळीच बंदोबस्त करणे आवश्यक आहे. सुतारवाडी नाक्यावरून प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत जाणारे विद्यार्थीसुद्धा आहेत. त्यांनासुद्धा इजा होऊ शकते. त्यामुळे या कुत्र्यांचा वेळीच बंदोबस्त करणे गरजेचे आहे.

# महिला सुरक्षितता, शिष्यवृत्ती या विषयावर कार्यशाळा

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरूड येथील अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स येथे महिला विकास कक्ष व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात शुक्रवारी (दि.२०) करण्यात आले होते. यात महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना त्यांच्या सुरक्षेसाठी महिला कायद्याची ओळख व्हावी, तसेच शासनामार्फत देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्तीची माहिती करून देण्यात आली. ही एकदिवसीय कार्यशाळा डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.



यावेळी डॉ. शेख यांनी आपल्या भाषणातून विद्यापीठ अनुदान आयोग व शासनामार्फत महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांबद्दल माहिती दिली. या कार्यशाळेसाठी विधीज्ञ ॲड. विक्रांत पाटील यांना प्राचारण करण्यात आले होते. त्यांनी महिला सुरक्षा कायद्यांची माहिती विद्यार्थिनींना करून दिली. नवाब शेख शिष्यवृत्ती, नोडल अधिकारी यांनी विद्यार्थिनींना शासनाच्या

**■ विद्यार्थिनींना सुरक्षा कायद्याची ओळख**

**■ विविध शिष्यवृत्तीची माहिती**

विविध शिष्यवृत्तीची माहिती करून दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोरमे निदा यांनी केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महिला विकास कक्ष प्रमुख डॉ. स्वाती खराडे, ग्रंथपाल अंजुम दाखवे व छापेकर अमरीन, फातिमा सुर्वे, हुमेरा घारे, अरफा कलबसकर, मदिहा कागदी, रिया ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

# तळा पाणीपुरवठा योजनेबाबत आढावा बैठक

**। तळा । वार्ताहर।**

तळाशहरातील तळा नगरपंचायत कार्यालयात उद्या शनिवारी (दि.२१) पाणीपुरवठा योजनेबाबत कामाचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

तळा शहरासाठी १३ कोटी ७० लक्ष रुपयांची पाणी योजना मंजूर करण्यात आली असून या पाणी योजनेला ५ डिसेंबर २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली होती. तसेच, कार्यादेश निघाल्यापासून १८ महिन्यांचा कालावधी कामासाठी देण्यात आला होता. मात्र, आठ महिने उलटूनही काम संथगतीने सुरू असल्याने सद्यःस्थितीत या योजनेचे काम कोणत्या टप्प्यात आहे यासह पाणीपुरवठा प्रकल्पाचे इस्टिमेटची प्रमाणित प्रत मिळावी व यासाठी नगरपंचायत कार्यालयात आढावा बैठक घेण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका ॲड. दिव्या रातवडकर यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे केली होती. त्याची दखल घेऊन मुख्याधिकारी मनीषा वजाळे यांनी सकाळी अकरा वाजता नगरपंचायत कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीला पाणीपुरवठा योजनेतील संबंधित इंजिनिअर व ठेकेदारांकडून सद्यः स्थितीत सुरू असलेल्या कामाबाबत माहिती सांगण्यात येणार आहे.

# वनविभागाने तालुक्यातील जागा निश्चित करावी

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील वन विभागाच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे उभी राहिली आहेत. त्यावर कारवाई होत नसल्याने ही अतिक्रमणे दिवसेंदिवस वाढत चालली आहेत. हे टाळण्यासाठी उरण वनपरिक्षेत्र अधिकारी नथुराम कोकरे यांनी उरण तालुक्यातील वन विभागाची जागा निश्चित करणे आवश्यक बनले आहे.



काही दिवसांपूर्वी उरण वनपरिक्षेत्र अधिकारी नथुराम कोकरे यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात वन विभागाची वहाळ गावातील परवानगी न घेता जमिनीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करून जमिनीची कोट्यवधी रुपयांची नुकसानभरपाई राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून हडप केल्याबद्दल गुन्हा नोंदविला आहे. उरण तालुक्यातील वन परंतु वन विभागाची जागा तालुक्यात कुठेकुठे आहे, याची कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे दिसते. उरण तालुक्यातील वन विभागाच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत आणि होताना दिसत आहेत. काहींनी तर आलिशान बंगले उभे केले आहेत. तर काहींनी डोंगर पोखरून माती चोरून नेली आहे. याकडे उरण वन विभागाचे लक्ष नसल्याबद्दल जनतेत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विभागाच्या जागेवरील वाढती अतिक्रमणे मोडीत काढण्यासाठी जागा निश्चित करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक बनले आहे. उरण वनपरिक्षेत्र अधिकारी नथुराम कोकरे यांनी तालुक्यातील वन विभागाच्या जागेची मोजणी करून कंपाऊंड घालावीत, त्यावेळी वन विभागाच्या जागेमध्ये असणाऱ्या अतिक्रमणांवर कारवाई करून ती जमीनदोस्त करण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## पनवेल टाइम्स सन्मान पुरस्कार सोहळा

**पनवेल :** गणेश कोळी संपादित पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी (दि. २१) पनवेल टाइम्स सन्मान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. पनवेलचे नाव उंचवणाऱ्या व्यक्ती आणि सेवाव्रती संस्थांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे वर्धापन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या माझ्या स्वप्नातील पनवेल.. या निबंध स्पर्धेच्या विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात येणार आहेत. हा सोहळा दुपारी ३.३० पनवेल शहरातील सुरुची बँक्वेट हॉल, सुरुची हॉटेल, कोहिनूर टेक्निकल जवळ येथे होणार आहे.

# वर्षावास भाद्रपद पौर्णिमा महोत्सव साजरा

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील आंबोली बौद्ध समाजसेवा संघातर्फे लुंबिनी बुद्धविहार येथे वर्षावास भाद्रपद पौर्णिमा महोत्सव जनार्दन हाटे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले असून कार्यक्रमाचे अध्यक्ष आयु. जनार्दन हाटे यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले. बौद्धाचार्य जीवन मोरे यांनी खमंग याचना देऊन आदरणीय भंते प्रज्ञानंद थेरो यांनी वंदन, त्रिसरण, गाथा पंचशील व बुद्ध धम्माच्या रितीरिवाजा प्रमाणे वंदनेस सुरुवात केली. यावेळी आंबोली गांव मंडळाकडून



आदरणीय भंते यांना भोजनदान, चिवरदान, परिष्कदान करण्यात आले. यावेळी देहुबाई चा. कांबळे व प्रणिता प. मोरे यांना दोन मिनिटे स्तब्धता पाळून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

मुरुड तालुका बौद्ध समाजसेवा संघाचे माजी अध्यक्ष नारायण दुधे, प्रवीण मोरे, विजय मोरे, रुपेश मोरे, सचीन हाटे, सुधीर हाटे, विलास कोंजिरकर, काशिनाथ कांबळे, रमेश मोरे, पांडुरंग जाधव,

**■ आयु. जनार्दन हाटे यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण**

बाळकृष्ण मोरे यांनी आदरणीय भंते यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तर, अकबर पठाण, अनंत पाडगे, सलिम खान, निकिता कोंजिरकर, मेघना हाटे, कुसूम मोरे, कमल मोरे, विमल मोरे, सुरेखा तांबे, वंदना मोरे, जिविता मोरे, कांबळे आदी मान्यवरांचादेखील पुष्पगुच्छ देऊन यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नितीन कोंजिरकर, अशोक कांबळे यांनी, तर महेश हाटे यांनी आभार मानले.

# बिगरशेती पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल या पतसंस्थेच्या सभासदांची २६वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि.२०) निजामपूर रोडवरील संस्था कार्यालयात संपन्न झाली.

सभेच्या सुरुवातीला उपस्थित सर्व संचालक मंडळ, भागधारक, मान्यवर मंडळींचे संस्थेतर्फे संचालक दिलीप जाधव व संचालक नरेश राजपूत यांनी स्वागत करून अहवाल सादर केला. यानंतर संस्थेचे कार्यतत्पर व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. ते इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

या सभेत संस्थेचे सभासद मनोज मिरजकर, रमेश मिरजकर यांनी विविध प्रश्न उपस्थित करून संस्थेच्या भरभराटीचे व प्रगतीचे कौतुक केले. संस्थेच्या उन्नतीसाठी आपण सर्वांनीच सातत्याने चांगल्या प्रकारे प्रयत्न केल्यानेच आपली संस्था आज नावारूपाला आली असल्याचे सांगून सर्व उपस्थितांचे आभार मानले. या सभेला संचालक दिलीप जाधव, संचालक नरेश राजपूत, संचालक उदय म्हशेलकर, संचालक दिलीप अंबुर्ले, सभासद रमेश मिरजकर, शांताराम मेकडे, मनोज मिरजकर, बळीराम मोरे, पत्रकार कमलाकर होवाळ आदींसह कर्मचारी वृंद, स्वल्पबचत प्रतिनिधी उपस्थित होते.

# 'सागम' मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबीर

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ कर्जत आयोजित माजी आ. तुकाराम स्वर्गीय सुर्वे प्रतिष्ठान, मुंबईतील ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने श्री कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या चिकित्सा शिबिरात २७८ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे प्रतिष्ठानने आयोजित केलेले २८ वे आरोग्य शिबीर होते.




या शिबिराचे उद्‌घाटन ज्योविस आयुर्वेदाचे डॉ. राज सातपुते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे जोशी, सदानंद जोशी, अभिजीत मराठे, मंगेश जोशी, निलेश परदेशी, डॉ. ज्योती सातपुते, डॉ. मणिशंकर गुप्ता, आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे आदी उपस्थित होते. अमित मराठे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या शिबिरात डॉ. राज सातपुते, डॉ. मणीशंकर गुप्ता यांच्यासह रोहित जाधव, मिकी सिंग, आरती गाते, सौम्या गुप्ता, मनीषा मीना, सत्यशील मौर्या, अभय दुबे, सौरभ कुशवाह, प्रिया उमर, कोमल सोलंके, आदिती गायकवाड, अभय ठोंबे, कृतूजा पोटे, दत्ता गिरम, नेहा कदम, वासंती साळगावकर, विनिता म्हाडी यांनी आरोग्य सेवा दिली. चामखीळ आणि भोवरी हे तात्काळ काढण्यात आले. तर पित्त, पाठदुखी, वात, रक्त मोक्षण, आमवात, अग्निकर्म, लकवा आजाराचे रुग्ण यांची चिकित्सा करण्यात आली.

# शेतकरी संघटनेची मुख्याधिकाऱ्यांसोबत बैठक

**। तळा । वार्ताहर ।**

तळा नगरपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ मिळावा, तसेच मनरेगाची कामे व्हावीत यासाठी नगराध्यक्षा माधुरी घोलप यांच्यासह तळा तालुका शेतकरी संघटना व मुख्याधिकारी मनीषा वजाळे यांच्यामध्ये नगरपंचायत कार्यालय तळा येथे बैठक पार पडली.



तळा नगरपंचायत झाल्यापासून नगरपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती नसल्याने त्यांना त्यापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे या सर्व शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा व मनरेगाची कामेही सुरू व्हावीत, अशी मागणी तळा तालुका शेतकरी संघटनेतर्फे मुख्याधिकाऱ्यांकडे करण्यात आली. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत मुख्याधिकारी मनीषा वजाळे यांनी लवकरच कृषी अधिकारी व गटविकास अधिकारी यांच्यासह संयुक्त बैठक घेतली जाईल व त्यामध्ये याबाबत विचार केला जाईल, असे आश्वासन उपस्थित शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

यावेळी नगराध्यक्षा माधुरी घोलप, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत राऊत, उपाध्यक्ष रवींद्र मांडवकर, सचिव कैलास पायगुडे, नगरसेवक नरेश सुर्वे, शैलेश घोलप यांसह शेतकरी संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुरुषोत्तम मुळे यांचे प्रतिपादन

# स्वयंरोजगाराद्वारे आर्थिक उन्नती साधणे शक्य

**। तळा । वार्ताहर ।**

स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्वतःची आर्थिक उन्नती साधता येते, असे विचार पुरुषोत्तम मुळे यांनी व्यक्त केले आहेत. पीएम विश्वकर्मा योजनेच्या कार्यशाळेप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मुळे म्हणाले की, पीएम विश्वकर्मा योजना २० सप्टेंबर २०२३ पासून सुरू करण्यात आली. तिला आता एक वर्ष पूर्ण होत आहे. या वर्षपूर्तीचे औचित्य साधून बोरघर हायस्कूल येथे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत टेलरिंग, ब्युटी पार्लर, गवंडी, लोहार, सुतार, वेल्डिंग, प्लंबिंग, कासार यासारखे जवळपास १५ कोर्स आपण करू शकतो. आज रुबीना परदेशी यांच्या माध्यमातून आपणास टेलरिंग व ब्युटी पार्लर या कोर्स ट्रेनिंग दिले जात आहे. यामध्ये १५ हजार रुपयांपर्यंतचे किट आपणास मिळणार आहे. तर, व्यवसायासाठी ३ लाखांपर्यंत कर्ज विनागॅरंटी अल्प व्याजदरात मिळणार आहे. अशा व्यवसायामधून महिला स्वतः रोजगार तयार करून आर्थिक स्वावलंबी जीवन जगू शकतात. एका कुटुंबात पती-पत्नी असे दोघे कमविते असतील तर कुटुंबाचे आर्थिक शोषण होणार नाही. ती



महिला कुटुंबाचा आर्थिक आधार बनू शकते. तेव्हा पीएम विश्वकर्मा या योजनेंतर्गत असणाऱ्या विविध कोर्सचा लाभ तालुक्यातील महिलांनी जास्तीत जास्त घ्यावा, असे विचार पुरुषोत्तम मुळे यांनी व्यक्त केले.

तसेच, किरण काप यांनी या उपक्रमाची पार्श्वभूमी सांगून बोरघर हायस्कूल हे केंद्र आहे. तालुक्यातील महिला या ठिकाणी येऊन या कोर्सचा लाभ घेत आहेत. परंतु, जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा फायदा घेतला तर महिला स्वतः च्या पायावर उभी राहून कुटुंबाला मदत करू शकते, असे सांगितले. तर, संचालिका रुबीना परदेशी यांनी या योजनेची पूर्ण माहिती महिलांना दिली. रूबीना म्हणाल्या की, आज आपण टेलरिंग व ब्युटीपार्लर हे दोनच कोर्स सुरू केलेले आहेत. भविष्यात आणखीन काही कोर्स सुरू करता येतील. त्यासाठी जास्तीत जास्त महिलांनी सहभाग घेतला पाहिजे. तळे तालुक्यात आपण सर्वांनी या योजनेची माहिती महिलांना दिली पाहिजे. यामधून महिलांचा उत्कर्षच होणार आहे. तुमच्यासाठीच हि योजना आहे. आर्थिक निधी १५ हजार रुपये किट साठी उपलब्ध होणार आहेत. प्रारंभी आवश्यक साहित्य घेण्यासाठी आणि मोठ्या व्यवसायासाठी बँक ऑफ इंडियामार्फत कर्ज पुरवठा देखील होणार आहे. तेव्हा महिलांनी आपला आर्थिक विकास साधण्यासाठी जास्तीत जास्त प्रमाणात सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी बँक ऑफ इंडिया तळा शाखाप्रबंधक नंदू चितळे, मुख्याध्यापिका किरण काप, संचालिका रुबीना परदेशी, हसंनमिया परदेशी यासंह शेकडो महिला उपस्थित होत्या.

> **अल्प व्याजदरात बँक तुम्हाला स्वतःच्या व्यवसायासाठी कर्ज देऊन सहकार्य करेल. जेणेकरून तुम्हा महिलांचे आर्थिक धोरण मजबूत करण्यासाठी मदत होईल. पीएम विश्वकर्मा योजनेंतर्गत अनेक लघुउद्योग सुरू करता येतील. त्याचा लाभ महिलांनी घेऊन आपला आर्थिक विकास साधावा.**
> **– नंदू चितळे, शाखाधिकारी, बँक ऑफ इंडिया तळा**

## पोलीस असल्याचे सांगून दागिन्यांची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

जनार्दन दामोदर मते (६३) हे कुडावे-पळस्पे येथे राहात असून, जेडब्ल्यूसी कंपनीच्या बाजूला असलेल्या सर्विस रोडवर आले असता ३५ ते ४० वर्षीय इसमाने पोलीस असल्याचे त्यांना सांगितले. तसेच, त्यांच्याकडील सोन्याची चेन आणि लॉकेट हे गळ्यातून काढण्यास देखील सांगित त्या इसमाने आपल्या ताब्यात घेतले. ते सोन्याचे दागिने जनार्दन यांच्या स्कुटीच्या डिक्कीत ठेवल्याचे भासवून ते डिक्कीत न ठेवता फसवणूक करून तो इसम घेऊन गेला आहे. याबाबत ३० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन आणि लॉकेट पळवून नेल्याप्रकरणी पनवेल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे..

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# भाऊबीजग्रस्तांचा टाहो

आजवर प्रकल्पग्रस्त, धरणग्रस्त किंवा पूरग्रस्त यांच्या प्रश्नांची चर्चा होत आली. त्या धर्तीवर आता राज्यातील भाऊबीजग्रस्त त्रस्त होऊन टाहो फोडत आहेत. लाडक्या बहिणींसाठी दर महिना पंधराशे रुपये देण्याच्या महायुती सरकारच्या निर्णयामुळे राज्य सरकारला एकूण ८६ हजार कोटींचा खर्च येणार आहे. ही योजना बंद होणार नाही असे नेते ठासून सांगत आहेत. आले का पैसे असे विचारत एकनाथ शिंदे राज्यभर फिरत आहेत. पण या एका योजनेने राज्याचे कंबरडे मोडण्याची वेळ येणार आहे. इतर खात्यांचे पैसे थांबवले जाऊ लागले आहेत किंवा त्यांचे नवीन प्रस्ताव लांबणीवर टाकले जात आहेत. हे किती काळ चालणार याचे उत्तर कोणाकडेही नाही. विधानसभा निवडणुका होईपर्यंत हा सर्व तमाशा असाच चालू राहणार आहे. सरकारतर्फे देण्यात येणारे शाळांचे अनुदान आणि आदिवासी शिष्यवृत्तीची रक्कम या योजनेसाठी वळवण्यात आल्याचा आरोप काल पुण्यात पत्रकार परिषदेत करण्यात आला. विशेष म्हणजे शिक्षणसंस्थांनी ही परिषद घेतली होती. एरवी कर्मचाऱ्यांच्या संघटना किंवा आदिवासींसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था अशा गोष्टी समाजापुढे आणत असतात. संस्थाचालकांची सरकारकडे बरीच कामे असतात. अनेकांचे व्यवहारही स्वच्छ नसतात. त्यामुळे साधारणपणे ही चालक मंडळी सरकारविरोधात बोलायला कधीही पुढे येत नाहीत. त्यातून सध्या निवडणुकांचा हंगाम आहे. अशा वेळी आपल्या भूमिकेचा या किंवा त्या राजकीय पक्षाशी संबंध जोडला जावू नये याची काळजी त्यांना घ्यावी लागते. पण त्याची तमा न बाळगता त्यांनी जाहीरपणे हा आरोप केला यावरून त्याचे गांभीर्य लक्षात येईल. संस्थाचालकांच्या महामंडळाचे सरकार्यवाह विजय गव्हाणे व इतर जण पत्रकार परिषदेत बोलले. २००५ सालापासून राज्यातील ६७ हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरली गेलेली नाहीत असेही यावेळी सांगण्यात आले. याचा अर्थ एकूण जागांच्या निम्म्या जागा रिक्त आहेत.

### दुसऱ्या हाताने काढून घेणे

शाळांच्या वेतन व वेतनेतर अनुदानाचे दोनशे कोटी रुपये लाडकी बहीण योजनेकडे वळवण्यात आल्याचे या चालकांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कमही मिळालेली नाही. शिक्षणहक्क किंवा आरटीई प्रवेशासाठी दिला जाणारा परतावा २०१७ सालापासून येणे आहे. दोन हजार कोटींची थकबाकी असताना यंदा केवळ साठ कोटी दिले गेले आहेत. स्वाभाविकच गरिब व मागासांना चांगल्या शाळेत प्रवेश देण्यासाठीची ही योजना राबवण्यास शाळा तयार होत नाहीत. त्यात खोडे घातले जातात. एकीकडे गरीब बहिणींसाठी पैसे दिल्याचा दावा करणारे सरकार त्याच बहिणींच्या मुलांना चांगल्या शाळांमध्ये जाऊ देत नाही असा याचा अर्थ आहे. केवळ शिक्षणच नव्हे सर्वच विभागांवर अशी कुऱ्हाड कोसळली आहे. पीआरएस संस्थेच्या अहवालानुसार, यंदाच्या अर्थसंकल्पात शेती व संलग्न उद्योगांसाठीच्या तरतुदीमध्ये यंदा तब्बल पंधरा टक्क्यांनी कपात करण्यात आली आहे. गेल्या वर्षीची ४२ हजार कोटींची तरतूद यंदा ३५ हजार कोटींवर आली आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याणच्या तरतुदीत नऊ टक्के कपात करण्यात आली आहे. म्हणजे एका हाताने दिल्यासारखे दाखवून दुसऱ्या हाताने त्याच्या दुप्पट काढून घेण्याचा हा प्रकार आहे. सर्वात कहर म्हणजे नगरविकास खात्याच्या तरतुदीत तब्बल २७ टक्क्यांची कपात झाली आहे. वास्तविक राज्याचे आता जवळपास पन्नास टक्के नागरीकरण झाले आहे. त्यामुळे ही तरतूद वाढवली जायला हवी. यामध्ये कपात म्हणजे, शहरांमधील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण इत्यादी सेवांची बोंब होणार. म्हणजे काय वाट्टेल ते करून निवडणुका जिंकण्याच्या महायुती सरकारच्या राक्षसी इच्छेपायी या राज्यातील शेतकरी, आदिवासी, शिक्षक, इत्यादींचा बळी दिला जाणार आहे. याला विरोध करण्याची हिंमत व शक्ती संघटनांमध्ये राहिलेली नाही. विरोधक त्यांची स्वतःची विधानसभेची लढाई लढण्यात मग्न आहेत. त्यामुळे या प्रश्नाला पुरेसे महत्व दिले गेलेले नाही. वास्तविक माध्यमे व विरोधक यांनी यावरून सरकारला फाडून खायला हवे.

### मतदारांनी धडा शिकवावा

मध्यंतरी, राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुंबईतील कंत्राटदारांनी थकित रकमांसाठी आंदोलन केले होते. असा कंत्राटदारांचे हात कायमच दगडाखाली असतात. यातले काही जण भ्रष्ट व लबाडही असू शकतात. पण तरीही ते कधीच जाहीरपणे सरकारच्या विरोधात बोलत नाहीत. आता बहुदा डोक्यावरून पाणी गेल्याने वैतागून त्यांनी आंदोलन सुरू केले असावे. मुंबईत सुमारे चारशे नोंदणीकृत कंत्राटदार असून मंत्रालय, आमदार निवास, शासकीय इमारती, इस्पितळे इत्यादींच्या देखभालीची जबाबदारी त्यांच्याकडे असते. सरकार कोणतेही असो, सत्ताधीशांपुढे नमून वागणे त्यांना क्रमप्राप्त असते. आता सर्व भीती बाजूला ठेवून ते सार्वजनिकरीत्या सरकारवर काही आरोप करीत असतील तर त्याची गंभीर दखल घ्यायला हवी. आपली पाचशे कोटी रुपयांची बिले थकली आहेत असा त्यांचा दावा असून मंत्री टोलवाटोलवी करीत आहेत. मध्यंतरी होमगार्डच्या भत्त्यांमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव ठप्प करण्यात आल्याचे सरकारी पत्रक सर्वत्र व्हायरल झाले होते. यामध्ये वित्त विभागाकडून बहुतांश निधी लाडकी बहीणसारख्या योजनांकडे वळवल्याने भत्त्यांमध्ये वाढ शक्य नसल्याचे स्पष्टपणे म्हटले होते. घरातली भांडीकुंडी विकून थाटात लग्न करावे आणि लोकांनी चांगले म्हणावे म्हणून गावजेवण घालावे अशातला हा सर्व प्रकार आहे. फरक इतकाच की, यात जात असलेला पैसा शिंदे यांच्या घरचा नसून सरकारचा म्हणजे तुम्हा-आम्हा जनतेचा आहे. आरोग्य, शिक्षण, रस्ते अशा योजनांसाठी तो खर्च व्हायला हवा आहे. मात्र यांना निवडणुकीत मते मिळायला हवीत म्हणून तो उधळला जातो आहे. निव्वळ या योजनेच्या प्रसिध्दीसाठी २७० कोटी रुपये खर्च होणार आहेत. आजवर महाराष्ट्र हे टुकीने कारभार करणारे राज्य मानले जात असे. पण आता इथे अत्यंत बेजबाबदार, मस्तवाल, परिणामांबाबत बेदरकार असे राज्यकर्ते लाभले आहेत. पुढची कित्येक वर्षे राज्यातील जनतेला याचे परिणाम सहन करावे लागणार आहेत. राज्यातील जनतेने अशा सरकारच्या पैशांना अजिबात भुलता कामा नये व त्यांना कायमची अद्दल घडवायला हवी.

विचार

# निर्यातमूल्य कपातीला गती, हर्क्युलस निर्मिती

***गेल्या काही काळामध्ये अर्थ-उद्योग क्षेत्रांमधील लक्षवेधी बातम्यांनी दिलासा दिला. पहिली लक्षवेधी बातमी म्हणजे सरकारने कांदा, तांदळावरील निर्यातमूल्य रद्द केले. दुसरी बातमी म्हणजे ब्रिटनमध्ये 'टाटा' ग्रीन स्टीलची निर्मिती सुरू करणार. भारतात हर्क्युलस लढाऊ विमाने तयार होणार आणि मिशन मौसम'मध्ये सरकार दोन हजार कोटी खर्च करणार या बातम्याही देशाची विकासवाटेवरील वाटचाल अधोरेखीत करणाऱ्या ठरल्या.***



**महेश देशपांडे**

सरत्या आठवड्यामध्ये देश, देशातले उद्योगविश्व विकासवाटेवर वेगाने वाटचाल करत असल्याचे पहायला मिळाले. विविध क्षेत्रांमधील काही लक्षवेधी बातम्यांनी दिलासा दिला. पहिली लक्षवेधी बातमी म्हणजे सरकारने कांदा, तांदळावरील निर्यातमूल्य रद्द केले. दुसरी बातमी म्हणजे ब्रिटनमध्ये 'टाटा' ग्रीन स्टीलची निर्मिती सुरू करणार. भारतात हर्क्युलस लढाऊ विमाने तयार होणार आणि मिशन मौसम'मध्ये सरकार दोन हजार कोटी खर्च करणार या बातम्याही देशाची विकासवाटेवरील वाटचाल अधोरेखीत करणाऱ्या ठरल्या.

कांदा आणि तांदळाच्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत सरकारने काही काळापूर्वी किमान निर्यात मूल्यावर निर्बंध लादले होते. ते आता काढण्यात आले आहे. त्यामुळे कांदा आणि बासमती तांदळाच्या निर्यातीला चालना मिळेल आणि शेतकऱ्यांना अधिक दर मिळू शकतील. 'डीजीएफटी'ने एक अधिसूचना जारी करून किमान निर्यात किंमत काढून टाकल्याची घोषणा केली. हा आदेश तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आला. कांद्याला प्रति टन ५५० डॉलर आणि बासमती तांदळाला प्रति टन ९५० डॉलर निर्यातमूल्य होते. यापेक्षा कमी दराने कांदा आणि बासमती तांदूळ परदेशात पाठवता येत नाही. देशांतर्गत बाजारपेठेत कांद्याचे भाव वाढू नयेत, यासाठी ही उपाययोजना करण्यात आली होती. लोकसभा निवडणुका आणि त्यानंतरच्या पावसाळ्यामुळे कांद्याच्या दरात मोठी वाढ होण्याची भीती सरकारला वाटत होती. त्यामुळे शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाली नाही. आता अनेक राज्यांच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी हा निर्णय घेण्यात आला आहे.

'डीजीएफटी' (विदेश व्यापार महासंचालक) ने महाराष्ट्र आणि हरियाणा आणि इतर राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी हा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे शेतकरी खूश होऊ शकतात. महाराष्ट्रात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. यापूर्वी कांदा आणि बासमती तांदळाच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली होती. ही बंदी उठवताना सरकारने किमान निर्यात मूल्याचा अडथळा आणला होता. यापूर्वी बासमती तांदळावर १२०० डॉलर प्रति टनची किमान निर्यात किंमत लागू करण्यात आली होती. हरियाणा आणि पंजाबमध्ये बासमती तांदळाचे भाव प्रति क्विंटल एक हजार रुपयांनी कमी झाले आहेत. सरकारने गव्हावरील साठा मर्यादाही कमी केली आहे. आता व्यापाऱ्यांना फक्त दोन हजार टन गव्हाचा साठा करता येणार आहे. यापूर्वी ही मर्यादा ३००० टन होती. यामुळे बिस्किट आणि ब्रेड बनवणारे आता कमी मर्यादा ठेवू शकतील. गव्हाचे दर २७०० रुपये प्रति क्विंटलवर पोहोचले आहेत.

अमेरिकेची संरक्षण साहित्य उत्पादन कंपनी 'लॉकहीड मार्टिन' एफ-१६ लढाऊ विमाने बनवते. ती आता भारतात सी-१३० जेएस सुपर हर्क्युलस विमाने तयार करेल. लॉकहीड मार्टिन आणि 'टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स लिमिटेड' यांनी यासाठी करार केला आहे. दोन्ही कंपन्यांमधील करारानुसार, भविष्यातील व्यावसायिक संधींसाठी परस्पर करारासाठी एक फ्रेमवर्क तयार केले जाईल. त्यात भारतीय हवाई दलाच्या '१२ सी-१३०जे' चे उत्पादन करण्याच्या कराराचा समावेश आहे. अमेरिकन सरकार आणि भारत सरकारकडून मंजुरी मिळाल्यानंतर भारतात 'सी-१३०जे' चे उत्पादन आणि जुळणी करण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय, 'लॉकहीड मार्टिन' ही कंपनी 'टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स लिमिटेड'च्या सहकार्याने भारतीय हवाई दलाच्या मध्यम वाहतूक विमान (एमटीए) कार्यक्रमांतर्गत विमानांची निर्मिती करेल. 'लॉकहीड मार्टिन'ला मध्यम वाहतूक विमानाचे कंत्राट मिळाल्यास कंपनी भारतात अतिरिक्त उत्पादन आणि असेंब्लिंग क्षमतादेखील स्थापित करेल.

'लॉकहीड मार्टिन' सोबतच्या या करारावर 'टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स'चे सीईओ सुकरण सिंग म्हणाले की, भारतीय हवाई दलाच्या मध्यम वाहतूक विमान प्रकल्पासाठी 'लॉकहीड मार्टिन'सोबतचा हा करार हा एक मैलाचा दगड आहे. ही घोषणादेखील महत्त्वाची आहे. कारण टाटा प्रगत प्रणालींना भारतातील मोठ्या विमान प्लॅटफॉर्मसाठी संरक्षण 'एमआरओ' क्षेत्रात प्रवेश करण्याचा मार्ग तयार केला जात आहे. भारतीय हवाई दल सुमारे ८० मध्यम वाहतूक विमाने खरेदी करण्याचा विचार करत आहे. यासाठी 'आरएफआय'ही जारी करण्यात आला आहे. 'लॉकहीड मार्टिन'ने सांगितले की, सी-१३०जे-३० सुपर हर्क्युलस भारतीय हवाई दलाच्या गरजा पूर्ण करते. हे रणनीतिक खेळ एअरलिफ्ट विमान आहे आणि भारतीय हवाई दलाकडे सध्या १३०जे-३० सुपर हर्क्युलसचा १२ विमानांचा ताफा आहे. 'लॉकहीड मार्टिन' आणि 'टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स' यांनी 'टाटा लॉकहीड मार्टिन एरोस्ट्रक्चर्स लिमिटेड' या नावाने २०१० मध्ये एक संयुक्त उपक्रम स्थापन केला होता. या भागीदारीद्वारे कंपनीने '२२० सी-१३० जे एम्पेनीज' तयार केले आहे.

'पाणी प्रत्येक मैलावर बदलते, भाषण दर चार मैलावर बदलते', या म्हणीतून भारतातील विविधता तर दिसून येतेच; शिवाय देशाच्या विविध भागांमधील हवामानाचीही माहिती मिळते. भारतात, हिमस्खलन किंवा बर्फाच्या डोंगरावरील भूस्खलनापासून फुगलेल्या नद्यांचा पूर आणि दुष्काळ किंवा त्सुनामीसारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. अशा परिस्थितीत आता सरकार 'मिशन मौसम' सुरू करणार आहे. 'मिशन मौसम'अंतर्गत सरकार तंत्रज्ञानाचा वापर करून हवामानाचा अंदाज सुधारण्याचे काम करेल. हा एक मोठ्या प्रमाणावर राबवला जाणारा उपक्रम असेल. त्यात हवामानबदल विज्ञानाच्या क्षमतांचा पुरेपूर फायदा करुन घेतला जाईल. 'मिशन मौसम'साठी सरकारने दोन हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. भारताच्या हवामान विभागाचे अपग्रेडेशन हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यामुळे देशातील हवामानाचा अचूक अंदाज बांधता येईल. एवढेच नाही, तर आपत्ती येण्याआधी सरकारला तयार राहण्यास आणि लवकरात लवकर जनजीवन सुरळीत करण्यास मदत होईल. चक्रीवादळ, पूर, दुष्काळ आणि उष्णतेची लाट यामुळे निर्माण झालेल्या आपत्तींमुळे देशात दर वर्षी सुमारे दहा हजार लोकांचा मृत्यू होतो. हवामानाचा अचूक अंदाज लावता आल्यास यातील अनेकांचे प्राण वाचू शकतात. यावरून 'मिशन मौसम'चे महत्त्व कळू शकते. 'मिशन मौसम'मुळे केवळ हवामानाचाच अंदाज सुधारणार नाही, तर लोकांना वेळेवर माहिती देण्याच्या कामातही सुधारणा होईल. एवढेच नाही, तर कृषी, विमान वाहतूक, संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन आणि पर्यटन यासारख्या उद्योगांचीही परिस्थिती सुधारेल.

आता नजर उद्योगविश्वातील एका महत्वपूर्ण बातमीकडे. टाटा स्टील ही कंपनी ब्रिटिश सरकार पोर्ट टॅलबोट, वेल्स, युनायटेड किंग्डम येथे ग्रीन स्टील प्रकल्प उभा करणार आहे. यामध्ये यामध्ये टाटा स्टील गुंतवणूक करणार आहे. 'टाटा स्टील'ने स्वतःच्या नियामक फाइलिंगमध्ये या कराराची संपूर्ण माहिती दिली आहे. यासाठी ब्रिटन सरकार ५४८० कोटी रुपयांचा निधी देणार असल्याचे सांगण्यात आले. 'टाटा स्टील'ने ब्रिटनमधील वेल्समधील पोर्ट टॅलबोट येथे १.२५ अब्ज पौंड खर्चून ग्रीन स्टील प्रकल्प सुरू करण्याची घोषणा केली आहे. या प्रकल्पासाठी ब्रिटिश सरकारकडून ५०० दशलक्ष पौंड म्हणजेच ५,४८० कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. पोलाद उत्पादन अधिक पर्यावरणपूरक बनवणे आणि औद्योगिक कार्बन उत्सर्जन आठ टक्क्यांनी कमी करणे या उद्देशाने ब्रिटनच्या पोलाद उद्योगात केली जाणारी ही आतापर्यंतची सर्वात मोठी गुंतवणूक आहे. 'टाटा स्टील'ने हे संयंत्र २०२५ पर्यंत कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे ब्रिटनची स्टील उत्पादन क्षमता वाढेलच, पण प्रादेशिक आर्थिक पुनरुज्जीवन आणि रोजगारनिर्मितीलाही मदत होईल.

हा प्लांट युरोपमधील सर्वात प्रमुख स्टील उत्पादन केंद्र बनू शकतो, असे मत 'टाटा स्टील'चे सीईओ टी. व्ही. नरेंद्रन यांनी व्यक्त केले. ही भागीदारी बऱ्याच काळापासून अपेक्षित होती. ब्रिटिश सरकारच्या मदतीशिवाय टाटा स्टील आपल्या ब्रिटनच्या व्यवसायातून बाहेर पडू शकली असती. 'टाटा स्टील'ने जाहीर केले आहे की त्यांनी सार्वजनिक सल्लामसलत सुरू केली आहे. डिसेंबर २०२४ पर्यंत आवश्यक ती मंजुरी मिळवण्यासाठी अधिकाऱ्यांशी चर्चा सुरू आहे. जुलै २०२५ पर्यंत साइटवर मोठ्या प्रमाणात काम सुरू होईल आणि पुढील तीन वर्षांमध्ये स्टील प्लांट कार्यान्वित होईल. ब्रिटिश सरकारच्या पाठिंब्याने पोर्ट टॅलबोटमधील या प्लांटमध्ये युरोपमधील प्रमुख स्टील उत्पादन केंद्र बनण्याची क्षमता आहे. साउथ वेल्सच्या आर्थिक पुनरुत्थानासाठी आणि रोजगारनिर्मितीसाठी त्यांनी हा प्रकल्प महत्त्वाचा असल्याचे वर्णन केले. टाटा स्टील बऱ्याच दिवसांपासून ब्रिटिश सरकारच्या या मदतीची वाट पाहत होती आणि सरकारी मदतीअभावी टाटा स्टील ब्रिटनमधील आपल्या स्टील व्यवसायातून बाहेर पडण्याचा विचार करत होती.

आजकाल

# रावीची भरारी- मराठी शाळा ते मँचेस्टर...

**राहूल हांडे**

मला कायम प्रवाहाच्या विरोधात पोहण्याची जन्मजात खोडच आहे. आपण घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग डोकं चालवण्यासाठी करण्याची माझी कायमची धडपड असते. त्यामुळे चाकोरीतील अन्यायग्रस्त जीवन घुसमटत जगत एक सभ्य माणूस म्हणून मी माझी ओळख कधीही निर्माण करू शकलेलो नाही. मुलीच्या शिक्षणाच्या बाबतीत देखील असलाच प्रवाह विरुद्ध पोहण्याचा आगाऊपणा मी केला. माझा आप्त परिवार, मित्रमंडळी, सहकारी इत्यादी सर्व लोक भारीतल्या भारी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना टाकत असताना मी मराठी माध्यमाची निवड मुलीच्या शिक्षणासाठी केली. माझी लेक रावी चौथीपर्यंत शुद्ध मराठी आणि पाचवीपासून सेमी इंग्रजी माध्यमातून शिकली. हा निर्णय घेताना गेली २४ वर्षे मी जो भाषाविज्ञान हा विषय मुलांना शिकवतो. त्याचे प्रात्यक्षिक स्वतःच्या मुलीवर करण्याचा निर्णय घेतला. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत कोणतेही मुल आपली मातृभाषा समग्रपणे अवगत करते आणि त्यानंतर ते जगातील कोणतीही भाषा अवगत करू शकते,हा भाषा विज्ञानाचा सिद्धांत मी वास्तवाच्या कसोटीवर उतरवून पाहण्याचा निर्णय घेतला. अनुदानित मराठी माध्यमाच्या शाळेत माझ्या मुलीला एकापेक्षा एक सरस शिक्षक- शिक्षिका लाभले. आम्ही त्यांच्या आणि त्यांच्या विद्यार्थिनीच्या अध्यापन अध्ययन प्रक्रियेत कधीही ढवळाढवळ केली नाही. एवढेच काय तर साधी चौकशी सुद्धा केली नाही. या सर्व आदर्श शिक्षक शिक्षकांच्या परिश्रमामुळे रावी प्रत्येक स्पर्धा परीक्षेत सहभागी झाली नाही,तर तालुक्यात प्रथम, जिल्ह्यातील तिसरी असा तिचा स्ट्राईक रेट कायम राहिला. त्यामुळे पाचवी व आठवी या तिला झालेल्या दोन्ही शिष्यवृत्ती परीक्षेत ती गुणवत्ता यादीत झळकली. एका बाजूला तिची ही शालेय वाटचाल सुरू असताना तिने तिच्या वाचनाचा व परकीय भाषा शिकण्याचा छंद मनापासून जोपासला. याबाबत देखील आम्ही अतिशय वात्रट पालक होतो. एखाद्या दिवशी रावी म्हणाली की,' मला आज शाळेत जायचं नाही.वाचन करायचे आहे.' तर आम्ही खुशाल परवानगी देत होतो. त्यामुळे दहावीपर्यंत रावीच्या इंग्रजी वाचनाचा प्रवास हॅरी पॉटर पासून सुरू होऊन टॉलस्टाय, चेकाँव, गॉर्की, वर्जिनिया वुल्फ आदीं मार्गे गॅब्रियल गारशिया मारकेज, मुराकामी आदींपर्यंत कधी येऊन पोहोचला ते समजलेच नाही. दहावीची परीक्षा संपल्या संपल्या तिने जगातील दहा प्रख्यात लेखकांची १० पुस्तके इंग्रजीतून मागवली आणि त्यांचा फडशा पाडला. इयत्ता सहावीत असताना अभियांत्रिकी महाविद्यालयात जाऊन तृतीय वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसोबत तिने जर्मन भाषेच्या तीन लेव्हल पूर्ण केल्या. आठवीला असतानाच मी सायन्स अथवा कॉमर्स या दोन्ही शाखेत प्रवेश न घेता फर्ग्युसन महाविद्यालयात इंग्रजी माध्यमातून आर्ट्स घेणार आहे. याची घोषणा करून टाकली. त्यावेळी आपण जगातील सर्वात सुखी पालक आहोत,हीच भावना आमच्या मनामध्ये उमटली. फर्ग्युसन महाविद्यालयात गेल्यानंतर तिने युकेमध्ये कायद्याचे शिक्षण पूर्ण करण्याचा ध्यास घेतला. आपल्याकडून बहुतेक जण पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी परदेशात जातात रावीने मात्र पदवीचे युकेत पूर्ण करण्याचे स्वप्न पाहिले. त्यासाठी अकरावी- बारावीची दोन वर्ष झपाटल्यासारखी ती कामाला लागली. युकेतल्या नामवंत विद्यापीठांमध्ये विधी शिक्षणाच्या पदवीसाठी प्रवेश मिळवण्याकरिता आवश्यक सर्व एंट्रान्स परीक्षा तिने स्वयं अध्ययनावर अत्यंत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण केल्या. त्यामुळे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, युनिव्हर्सिटी ऑफ मँचेस्टर, युनिव्हर्सिटी ऑफ ऐडिनबरा व किंग्स कॉलेज लंडन या चार जगद्विख्यात विद्यापीठांनी तिला प्रवेशासाठी ऑफर दिली. मात्र विधी शिक्षणात 'युनिव्हर्सिटी ऑफ मँचेस्टर' चे स्थान जगात इतर तीन पेक्षा अव्वल असल्यामुळे युनिव्हर्सिटी ऑफ मँचेस्टर ची तिने अखेर निवड केली. युनिव्हर्सिटी ऑफ मँचेस्टरची ऑफर ही कंडीशनल होती. बारावीला ९०% पेक्षा अधिक गुण मिळाले तरच प्रवेश मिळणार होता. रावीने बारावीला ९३% गुण मिळवले. तिचा एकूण शैक्षणिक प्रवास पाहता युनिव्हर्सिटी ऑफ मँचेस्टर ने रावीला सात हजार पाऊंडची (भारतीय चलनात साडेसात लाख रुपये) शिष्यवृत्ती जाहीर केली. अशी मराठी शाळेतून शिकलेली माझी लेक शुक्रवारी युनिव्हर्सिटी ऑफ मँचेस्टर मध्ये जाऊन पोहोचली. भाषाविज्ञान शिकवणारा एक प्राध्यापक आणि पालक म्हणून मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व माझ्या डोक्यात यामुळे कायमचे कोरले गेले. मुलांना आपल्या भाषेत शिकू द्या आणि मुक्तपणे त्यांच्या कलाने शिकू द्या. आपल्या अधुऱ्या स्वप्नांचे ओझे त्यांच्या खांद्यावर लादू नका. जगात आपले मूल एक स्वतंत्र जीव म्हणून जन्माला आलेले आहे. त्याला त्याच्या मनाप्रमाणे जगण्याचा व स्वतःला आकार देण्याचा निसर्गदत्त हक्क व स्वातंत्र्य आहे, हे मान्य करा. यासाठी कोणत्याही भाडोत्री व फसव्या शिक्षण तज्ज्ञांची गरज नाही. आपले मूल व त्याचा कल ओळखा.

**(साभार)**

लोकसंसद

## हा तर भक्तांच्या भावनांशी खेळण्याचा प्रकार

भारतातच नव्हे तर जगातील सर्वात श्रीमंत देवस्थानांपैकी एक असलेल्या तिरुपती बालाजी व्यंकटेश्वरच्या मंदिरात तिरुमला तिरुपती देवस्थानमद्वारे देण्यात येणाऱ्या प्रसादाच्या लाडूंसाठी शुद्ध तुपाऐवजी प्राण्यांच्या चरबीचा वापर केला जात होता असे वक्तव्य खुद्ध आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केल्यामुळे कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेला तडा गेला आहे. या संदर्भातील 'सेंटर ऑफ ॲनालिसिस अँड लर्निंग इन लाइव्हस्टॉक अँड फूड' या गुजरातच्या आनंद येथील नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाच्या प्रयोगशाळेच्या अहवालानुसार तिरुपती मंदिराच्या प्रसादाचे लाडू तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तुपात गोमांस, डुकराची चरबी आणि माशाचे तेल इत्यादी घटक आढळून आल्याचे म्हटले आहे. या अहवालाच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह असले तरी, मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी राजकीय हिशोब चुकता करण्यासाठी त्यांचे कट्टर राजकीय विरोधक असलेले माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या काळात तिरुपती देवस्थानात असे प्रकार घडत होते असे म्हटल्यामुळे तिरुमलाच्या पावित्र्याला निश्चितच धक्का पोहोचला आहे. राजकारणाच्या गदारोळात एकमेकांची उणीदुणी काढताना हा भक्तांच्या भावनांशी खेळण्याचा प्रकार म्हणावा लागेल.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२१ सप्टेंबर**

**१८३५ :-** धर्म, तत्वज्ञान, इतिहास आणि मुंबईच्या एल्फिस्टन हायस्कूलचे पहिले भारतीय प्राचार्य तसेच मुंबई विद्यापीठाच्या पहिला पदवीधरांपैकी एक वामन आबाजी मोडक यांचा जन्म. व्याकरण, साहित्य, वेदांत आणि न्याय आदी शास्त्राचे अध्ययन करणाऱ्या मोडकांनी सामाजिक, धार्मिक सुधारणांच्या वादविवादात विष्णूशास्त्री चिपळूणकरांशी वृत्तपत्रामधून दोन हात केले. विविध विषयांवर कीर्तने, प्रवचने व्याख्याने दिली. त्यांच्या व्याख्यांनाचे संग्रह प्रसिध्द झाले. तथापि 'उत्तरनैषध-चरित्र' हे गद्यपद्यात्मक नाटक ही त्यांची एकमेव ललित साहित्यकृती. **१८८२ :-** लेखक आणि प्राचीन मराठी काव्याचे अभ्यासक बाळकृष्ण माधव खुपेरकर यांचा जन्म. **१९२० :-** संत रामजी विठू गहाणे यांचा जन्म. भगवद् भक्तीचा प्रसार करणाऱ्या संत गहाणे यांनी 'गुरुकृपा भजनमालिका' भजनसंग्रह प्रसिध्द झाला आहे. **१९२१ :-** लेखक, प्रकाशक बाळकृष्ण मोरेश्वर लोणकर यांचा जन्म. यांची 'इंद्राणी', 'डॉ. गंगा', 'सर्जन' ह्या कादंबऱ्या, 'कुलदैवत खंडोबा' हे धार्मिक, 'माझी माणसं' हे व्यक्तिचित्र आणि 'इनामी घोडा', 'पप्पूचा पोपट', 'राजा हत्ती' हे त्यांचे बालकथासंग्रह, अशी साहित्य संपदा. **१९२६:-** समीक्षक, संपादक, संशोधक डॉ. सुरेश डोळके यांचा जन्म. विदर्भातील संतकवी व काव्य यांच्यावर लेखमाला व 'रुक्मिणी स्वयंवर' या ग्रंथाचे संशोधन, याशिवाय डॉ. दप्तरी यांचा 'धर्ममीमांसा' हा ग्रंथ तसेच 'प्राचीन मराठी काव्य', 'संशोधन शलाका', 'संशोधन समस्या', 'संशोधन समीक्षा' ही त्यांची समीक्षात्मक पुस्तके प्रकाशित. **१९३९:-** कवी, कथा-कादंबरीकार लक्ष्मीकांत तांबोळी यांचा जन्म. 'हुंकार', 'अस्वस्थ सूर्यास्त', 'मी धात्री मी धरित्री' हे काव्यसंग्रह. तर 'तवंग', 'सलामसाब', 'कृपणकाल', 'गंधकोषी' ही पुस्तके आणि 'दूर गेलेले घर', 'अंबा', 'गंधकाळी', 'कृष्णकमल' ह्या कादंबऱ्या आणि 'प्रवृत्ती', 'कबीराचा शेला', 'सायंसावल्या', 'गोकूळवाटा' ह्या गीतमालिका त्यांच्या नावावर आहे. **१९४४ :-** विविध नियतकालिकातून कथालेखक करणाऱ्या स्नेहल वासुदेव जोशी यांचा जन्म. 'अधांतरी', 'शंख शिंपल्याची बाहुली' या त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. **१९५६ :-** लेखक संत गंगाराम दसरु मेश्राम यांचा जन्म. ह्यांचा 'भारुडावली', 'भाग १ ते ३' हा भजनसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९५७ :-** लेखक, संपादक चंद्रकांत शांताराम शहासने यांचा जन्म. शासनाच्या उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षक पदावरुन निवृत्त झालेले शहासने 'ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, दासबोधाचे जाणकार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवन चरित्र ३४०७ ओव्यांतून गुंफून 'गाथा भीमरावांची' हा काव्यग्रंथ साकारला. याशिवाय 'स्वा. सावरकर', 'योगासनातून व्यसनमुक्ती', 'पर्यावरण स्तोत्र', 'सावरकरांची गरुड झेप' ही पुस्तके तसेच बलिदानांच्या इतिहासाचे अनेक लेखांक त्यांनी लिहिलेले आहेत. तथापि त्यांची सर्वात महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे त्यांनी साकारलेला 'देशभक्त कोश' हा ८३९ पृष्ठांच्या या महाग्रंथातून त्यांनी इ. स. १७५७ ते गोवा मुक्तीपर्यंतच्या देशभक्तांच्या त्यागाच्या बलिदानाचा इतिहास त्यांनी साकारलाय. **१९८२ :-** कवी, कथाकार, अनुवादक सदानंद शांताराम रेगे यांचे निधन. 'अक्षरवेल', 'गंधर्व', 'देवापुढचा दिवा', 'वेड्या कविता' हे काव्यसंग्रह, तर 'जीवनाची वस्त्रे', 'चांदणे', 'मासा आणि इतर विलक्षण कथा' हे कथासंग्रह गाजले. काही अनुवादीत नाटके प्रकाशित. **१९९९ :-** नाटककार, एकांकिका दिग्दर्शक आणि मुलांसाठी 'रंजन कला मंदीर' ह्या संस्थेचे संस्थापक पुरुषोत्तम व्यंकटेश दारव्हेकर यांचे निधन. 'उपाशी राक्षस, कोरा कागद, झिमझिम' ही लहान मुलांसाठी नाटके त्यांनी लिहिली. 'ल्पनेचा खेळ व इतर एकांकिका' हे त्यांचे एकांकिकाचे पुस्तक. 'अबोल झाली सतार' ही त्यांची गाजलेली एकांकिका. यानंतर त्यांनी चंद्र नभीचा ढळला', 'वऱ्हाडी माणसं', 'पृथ्वी गोल आहे', 'नयन तुझे जादूगर', 'घनश्याम नयनी आला आणि कट्यार काळजात घुसली' मिळून ११ नाटके लिहिली. याशिवाय 'अश्रुंची झाली फुले', 'नटसम्राट' ह्या गाजलेल्या नाटकांचे त्यांनी दिग्दर्शन केले.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### फेर निविदा सुचना (२nd Call)

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/४३२४/प्र.क्र.११/३९५४/२०२४ दिनांक : २०/०९/२०२४

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government/State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार फेर निविदा मागवित आहेत.

| अ. क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/३५९/२०२३-२४ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ, प्रभाग क्र.०१ खारघर, सेक्टर-१४, भुखंड क्र.१६ येथे स्मशानभूमी विकसीत करणे. (२nd Call) | १,३६,१०,०९८/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.२३/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त -I**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे वरई तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वरई तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मोरेश्वर वामन कोळी | ४७ | २१ | ०-०७-०० | ०.१० |
| | ४७ | २३ | ०-०६-०० | ०.०५ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २१/०९/२०२४

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता: कोर्ट व्ह्यू को.ऑप.हौ. सोसायटी, शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.:९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ता: ओम श्री भाग्योदय को. ऑप. हौ.सो. कोतवाल नगर, कर्जत, जि. रायगड
मो.:९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थि मौजे हातनोली, ता. खालापुर जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतींचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतींचे वर्णन**
**मौजे -हातनोली, ता. खालापुर, जि. रायगड येथिल**

| भोगवटादारांची नावे | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. सुधीर दत्तात्रेय ठोंबरे | ७२ | १ | ०-३३.०० | ०.७२ |
| | ७२ | ३अ/१ | ०-२५.०० | ०.१४ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा- कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१(एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री. सुधीर दत्तात्रेय ठोंबरे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.: २१/०९/२०२४.

**श्री. तुषार द. देवरे,** ॲडव्होकेट
पत्ता : फ्लॅट नं.ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा.लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि. रायगड.
मोबाईल नं. ९३२५००४००८
tushar.deore82@gmail.com

## :: जाहीर नोटीस ::

दि.२१/०९/२०२४

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** मौजे/गाव- भेरसे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील पुढील वर्णनाच्या मिळकतींचे वर्णन :-

| अ. क्र. | गांव | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १. | भेरसे, ता. अलिबाग | ७०/१ | ०-४८-०० | १-१० |
| २. | भेरसे, ता. अलिबाग | ७०/२ | ०-३३-९० | ६-८९ |
| ३. | भेरसे, ता. अलिबाग | ५३/१ | ०-३१-७० | ४-२९ |
| ४. | भेरसे, ता. अलिबाग | ५३/२ | ०-७०-३० | १-८१ |
| ५. | भेरसे, ता. अलिबाग | ५७ | ०-२१-१० | ४-५७ |

वरील वर्णनाच्या मिळकती ह्या मिळकतींचे विद्यमान मालक १) किरण रामदास नाईक, २) अजित सिताराम नाईक, ३) प्रशांत दत्ताराम नाईक, ४) प्रकाश रघुनाथ कवळे, ५) रमेश वासुदेव म्हात्रे यांचेकडुन आमचे अशिल यांनी नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविलेल्या आहेत.

सदरच्या मिळकती निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतींच्या विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी देखील या मिळकतींमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतींबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचिही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांत सकृतदर्शनी लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजू आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागावून येणाऱ्या हरकती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ॲड.अन्वर ए. हुसेन**
बी.ए.एलएल.बी.
ॲडव्होकेट
एस.टी.डेपोजवळ, दत्तमंदिर रोड,
मुरुड-जंजिरा, जि. रायगड. ४०२४०१.
९४२३८२२७९०

## जाहीर नोटीस
### निवासी नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कर्जत यांचे न्यायालयात

क्र. प्रशा-२/कात-२/५८/२०२४
तहसीलदार कर्जत यांचे कार्यालय
कर्जत दिनांक ०९/०९/२०२४

सौ. अमृता अरुण अभंगे, (लग्नानंतरचे)
सौ.विमल सखाराम गायकवाड (लग्नापूर्वीचे) — अर्जदार
मु. दामत-भडवल, ता. कर्जत

विरुध्द

ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक — सामनेवाला
ग्रामपंचायत, दामत-भडवल

या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार यांच्या जन्माची नोंद दि.२५/१२/१९७५ रोजी राहत्या घरी म्हणजे मु, भडवल, ता. कर्जत, जि.रायगड, येथे झाले असून त्यांच्या जन्माची नोद ग्रामपंचायत, दामत-भडवल कार्यालय यांचे जन्म- मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्माच्या नोंदीचे आदेश मिळणेकरीता निवासी नायब तहसीलदार तथा दंडाधिकारी कर्जत यांचे न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत दामत-भडवल दि. २५/१२/१९७५ रोजी झालेचे कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे.न्यायालयांत दि.११/१०/२०२४ रोजी समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना त्यांच्या जन्माची नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९/०९/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
निवासी नायब तहसीलदार
तथा
कार्यकारी दंडाधिकारी कर्जत

## पनवेल महानगरपालिका
### अग्निशमन विभाग
### दरपत्रक मागणी सुचना

याद्वारे सर्व खाजगी प्रशिक्षण आयोजक तथा खाजगी अकादमी संस्था चालक यांना सुचित करण्यात येते कि, पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांकरीता जलीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

याकामी सर्व ईच्छुकांनी द्यावयाच्या प्रशिक्षणाबाबत अधिक माहिती करीता अग्निशमन विभागाशी संपर्क साधुन आपले प्रतिव्यक्ती दर जी.एस.टी सह बंद लिफाफ्यात दि. ०३/१०/२०२४ रोजी पर्यंत अग्निशमन विभागात सादर करावेत.

सही/-
**(कैलास गावडे)**
**उपआयुक्त (मुख्यालय-I)**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र./पमपा/अग्नि/९९२१/प्र.क्र.१८०/३११७/२०२४
दिनांक :- २०/०९/२०२४
ठिकाण :- पनवेल महानगरपालिका, पनवेल.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणेः-

**मौजे कळंब, ता.सुधागड, जि.रायगड. येथील जमीन मिळकती.**
**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १)श्री.अवधूत शिवाजी मांढरे. २)श्रीम.स्नेहल शिवाजी मांढरे. | ८१/८ | ०-३१-६० | १-८१ |
| श्रीम. सविता शिवाजी मांढरे | ६३/९ | १-८४-०० | ०-३२ |
| | ८०/५ | ०-६९-०० | ०-१२ |
| | ८०/५ | ०-८५-०० | ०-२५ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हीतसंबध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
दिनांक :- २१/०९/२०२४

खरेदी घेणार-**श्री.सुधीर जानु शेळके**
रा.पाली ता.सुधागड जि. रायगड.
मो. नंबर ८८८८७५२३१४

खरेदीदारांचे लेखक,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
**श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,**
श्री. राजेश एस. राठोड
२८६अ राठोड सदन ऑफिस नं.८पाली, ता.सुधागड, जि. रायगड.
मो.९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## मे. कार्यकारी दंडाधिकारी साहेब. तळा यांचे न्यायालयात
### जाहिर नोटीस मसुदा

१.श्रीम निकीता नरेश जाधव — अर्जदार
रा.सोनसडे, ता. तळा जि. रायगड

विरुध्द

१.निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी
गृप ग्रामपंचायत सोनसडे ता. तळा जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा

तमाम जनतेस या जाहिर नोटीसाद्वारे कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांनी त्यांचे पती कै. नरेश भागुराम जाधव यांचा मृत्यू दि. ०८/०१/२०२१ रोजी मौजे सोनसडे, ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि. २१/०८/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे पती कै. नरेश भागुराम जाधव यांचा मृत्यू दि.०८/०१/२०२१ रोजी झाले असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे पती कै. नरेश भागुराम जाधव यांचा मृत्यू दि.०८/०९/२०२१ रोजी मौजे सोनसडे येथे झाला असल्याचे गृहित धरुन सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.१८/०९/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

**तहसिलदार तळा**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. प्रभाकर लक्ष्मण काठे, २) श्री. दिगंबर लक्ष्मण काठे, ३) श्री. दिपक लक्ष्मण काठे, ४) शुभांगी चंद्रकांत म्हात्रे, ५) सुमन विद्याधर म्हात्रे, ६) सुनंदा लक्ष्मण काठे,७) मृदुला पुष्कर वैती व ८) नेत्रा हर्षद शिंदे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे | २४१ | ०-५०-६० | १२.६२ |
| | | पो. ख.०-०७-३० | |
| | | ०-५७-९० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २१/९/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## मे. कार्यकारी दंडाधिकारी साहेब. तळा यांचे न्यायालयात
### जाहिर नोटीस मसुदा

९. श्री. रामचंद्र तुकाराम ठमके — अर्जदार
रा. मालाठे, ता. तळा जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी
गृप ग्रामपंचायत गिरणे ता. तळा जि.रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा

तमाम जनतेस या जाहिर नोटीसाद्वारे कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांनी त्यांची आजी कै. रखमाबाई रामजी लोखंडे यांचा मृत्यू दि.१४/०४/१९८३ रोजी मौजे मालाठे, ता. तळा जि. रायगड येथे झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि. ०४/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांची आजी कै. रखमाबाई रामजी लोखंडे यांचा मृत्यू दि. १४/०४/१९८३ रोजी झाले असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांची आजी कै. रखमाबाई रामजी लोखंडे यांचा मृत्यू दि.१४/०४/१९८३ रोजी मौजे मालाठे येथे झाला असल्याचे गृहित धरुन सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि १८/०९/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

## राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
प्रशासकीय इमारत, चेंबूर, मुंबई 400 074
CIN : L24110MH1978GOI020185

जाहिरात क्र. 15072024

### ट्रॉम्बे/थळ युनिट/क्षेत्रीय कार्यालयांसाठी संपूर्ण भारतात भरती

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ लिमिटेड) ही खते आणि औद्योगिक रसायनांचे उत्पादन आणि विपणन व्यवसायातील एक अग्रणीय नफा कमवणारी कंपनी आहे. ज्याचा एकूण व्यवसाय सुमारे **रु.17146.74 कोटी** आहे. कंपनीला ऑगस्ट 2023 मध्ये प्रतिष्ठित ''नवरत्न'' दर्जा प्रदान करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्तरावरील विपणन नेटवर्कसह त्याचे उत्पादन युनिट महाराष्ट्र (ट्रॉम्बे चेंबूर, मुंबई आणि थळ, जिल्हा-रायगड) मध्ये आहेत. कंपनी उत्कृष्ट करियर विकास संधी प्रदान करते. कंपनी खालील पदांची भरती करू इच्छित आहे:

| अनु. क्र. | पद कोड | शाखा व पदाचे नाव | रिक्त पदाची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | E0FIN/072024 | सहायक अधिकारी (वित्त) E0 श्रेणी | 9 |

इच्छुक उमेदवार अधिक माहितीसाठी कंपनीची वेबसाइट **www.rcfltd.com** वरील ''रिक्रूटमेंट'' सेक्शन पहावे.

**मुख्य महा व्यवस्थापक (मा. सं.) निग.**

समृध्दिची एकत्र वाटचाल

## महाराष्ट्र शासन
### सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, सत्कार प्रेस समोर, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा क्र. ११/मा. अभि./जाहीर नोटीस/ /सन २०२४ २१८६ दिनांक : १९/०९/२०२४

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार गंगाधर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी १) श्री. हरेश गंगाधर कदम पत्ता- फ्लॅट नं. १०, पहिला मजला, गंगाधर सोसायटी, चेंढरे, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड २) मेसर्स व्ही. पी. कन्स्ट्रक्शन तर्फे प्रोप्रा. श्री. विलास आत्माराम पाटील, विकासक पत्ता-अलिबाग रेवस रोड, मगर हाऊस जवळ, पो. वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

मौजे चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड येथील सि.स.नं. १३०८/१ (भुमापन क्रमांक व उपविभाग १०६/२/१ क्षेत्र ९४३.०० चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी क्र. ०१ व ०२ यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरच्या नोटीस Not Delivered Addressee left without instructions अशा शेरा मारुन परत आलेल्या असल्याने त्यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ०८/१०/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक १९.०९.२०२४

सही/-
**(प्र.का.जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## :: जाहीर नोटीस ::

२१/०४/२०२४

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- मौजे/गाव- भेरसे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील पुढील वर्णनाच्या मिळकतीचे वर्णन :-

| गांव | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| भेरसे, ता. अलिबाग | ५९ | ०-३१-७० | ६-२५ |

वरील वर्णनाची मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक १) अजित सिताराम नाईक, २) किरण रामदास नाईक, यांचेकडुन आमचे अशिल यांनी नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविलेली आहे.

सदरची मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचिही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांत सकृतदर्शनी लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागावून येणाऱ्या हरकती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ॲड. अन्वर ए. हुसेन**
बी.ए.एलएल.बी.
ॲडव्होकेट
एस.टी. डेपोजवळ, दत्तमंदिर रोड,
मुरुड-जंजिरा, जि. रायगड. ४०२४०१.
९४२३८२२७९०

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
### (तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र. अर्ज १२/२०२३

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री मच्छिंद्र चंद्रकांत नवगावकर
रा. मु. वरसोली- कोळीवाडा — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत वरसोली,
ता. अलिबाग, जिं. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार श्री मच्छिंद्र चंद्रकांत नवगावकर यांचा जन्म दि. ०१/०१/१९८१ रोजी राहत्या घरी मौजे वरसोली ता. अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.

२. जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत वरसोली कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३)अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत वरसोली येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत वरसोली यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दि.२०/१०/२०२४ रोजी पर्यंत मे.तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आंपली हरकत/ तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २०/०९/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २०/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## शिक्षक पाहिजेत

एज्युकेशन सोसायटी, लोअर तुडील ता. महाड, जि रायगड या अल्पसंख्यांक संस्थेच्या एच.के.देशमुख व पी.खतीब हायस्कूल व ज्यु. कॉलेज, लोअर तुडील ता. महाड या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये २०% अंशतः अनुदानित तत्त्वावर खालीलप्रमाणे शिक्षकांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | शै. अर्हता | विषय | संख्या |
|---|---|---|---|
| १ | M.Sc. - B.Ed | Chemistry | ०१ (पुर्णवेळ ) |
| २. | M.Sc - B.Ed | Maths | ०१ (पुर्णवेळ ) |
| ३. | M.Sc - B.Ed | Physics | ०१ (पुर्णवेळ ) |
| ४. | M. A - B.Ed | English | ०१ (पुर्णवेळ ) |
| ५. | M.Com - B.Ed | B.K + Economics | ०१ (पुर्णवेळ ) |
| ६. | M.Com - B.Ed | O.C+S.P | ०१ (पुर्णवेळ) |

तरी इच्छुक उमेदवाराने आपले अर्ज मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रतिसह बुधवार दि. २६.०९.२०२४ रोजी ठिक ११.०० वा. खालील पत्त्यावर उपस्थित राहावे.

पत्ता
**सचिव**
**एज्युकेशन सोसायटी. लोअर तडील**

# आकर्षित करणारा दिपगृह...



दापोलीजवळील हर्णे मुरूड येथील कणकदुर्गावरील दिपगृह पर्यटकांना नेहमी आकर्षित करते. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# ई–रिक्षा चालकाची बेपर्वाई

■ मोबाईलवर पाहणे पडले महागात
■ सुदैवाने कोणतीही हानी नाही

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**माथेरान या पर्यटनस्थळी पर्यावरणपूरक ई–रिक्षा चालविण्यात येत आहेत. या ई–रिक्षांपैकी एका रिक्षाचे चालक हे प्रवासी वाहतूक करीत असताना स्वतःच्या मोबाईल फोनमध्ये काही न्याहाळत होता. परिणामी, ई–रिक्षा कलंडली आणि अपघात झाला. असा दावा त्यावेळी बाजूने घोड्यावरून जाणाऱ्या प्रवाशाने केला आहे. तर, ई–रिक्षा चालकाने घोडा समोर आला म्हणून रिक्षा रस्त्याच्या एका बाजूला कलंडली, अशी बतावणी केली आहे.**

माथेरान या पर्यटनस्थळी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रायोगिक तत्त्वावर ई-रिक्षा चालविली जात आहे. १९ सप्टेंबरला सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास माथेरानमधील ई-रिक्षा पायलट प्रकल्पामधील ई-रिक्षा क्रमांक १६ ही माथेरान हुतात्मा स्मारक येथून दस्तुरी टॅक्सी स्टँडकडे निघाली होती. दरम्यान, गाडी चालवत असताना चालक हा मोबाईलवर बोलत होता. रिक्षामध्ये एक पुरुष, महिला आणि एक छोटा मुलगा होता. मोबाईलवर बोलत असल्यामुळे वेग समजला नाही. परिणामी, मायरा पॉईंटजवळील तयाब लॉजजवळ रिक्षा धक्क्याला लागल्यामुळे ती पलटी झाली. यावेळी ई-रिक्षामधील प्रवाशांनी आरडाओरडा सुरू केला.



या ठिकाणी समोरच बसलेले सीताराम कुंभार आणि संतोष पवार यांनी धाव घेऊन गाडी उभी करण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत आणखी दोघे, तिघेजण येऊन त्यांनी गाडी उभी केली. गाडीमध्ये बसलेल्या पर्यटकांनी सांगितले की, गाडीचा वेग जास्त होता. त्यात चालक हा मोबाईलवर बोलत होता. त्या पर्यटकाला किरकोळ दुखापत झाली असून, चालकाच्या डोक्याला मार लागला आहे. मात्र, या अपघातासला रस्त्याने जाणारा घोडा जबाबदार आहे, असा आरोप रिक्षाचालकाने केल्याने या घटनेला वेगळे वळण लागले आहे.

## परिवहन विभाग लक्ष देणार का?

**या रिक्षा सुरू होण्यासाठी परिवहन विभागाने हिरवा कंदील दाखवला होता. त्यानंतर ई-रिक्षा सुरू झाल्या होत्या. पण, या ई-रिक्षा सुरू होऊन तीन महिने उलटूनसुद्धा परिवहन विभागाचे अधिकारी इकडे परीक्षणासाठी फिरकलेच नाहीत. यामुळे आतातरी परिवहन विभाग इकडे लक्ष देणार का? असा प्रश्न स्थानिकांसह पर्यटकांकडून विचारला जात आहे.**

## प्रसिद्धी प्रमुखपदी दत्ताभाऊ शेडगे

**। रसायनी । वार्ताहर ।**

ऑल इंडिया धनगर समाज महासंघ नवी दिल्लीच्या कोकण प्रदेश संपर्क प्रमुखपदी रामचंद्र नाना पुकळे यांची नुकतीच निवड करण्यात आली. तर, प्रसिद्धी प्रमुखपदी खालापूर येथील युवा पत्रकार दत्ताभाऊ शेडगे यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांना निवडीचे पत्र ऑल इंडिया धनगर समाज महासंघांचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे यांच्या हस्ते देण्यात आले. त्यांची निवड होताच ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य संतोष घाटे, जिल्हाध्यक्ष प्रकाश उघडे, प्रभारी अध्यक्ष आनंदराव कचरे, उपाध्यक्ष सुनील कोकळे यांनी भेटून त्यांचे अभिनंदन करूनपुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## चिरनेरमध्ये साखरचौथ गणेशोत्सवाची लगबग

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर परिसरात साखरचौथ गणेशोत्सव विविध भागात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. साखरचौथ गणपतीच्या आगमनानंतर शनिवारी विधीपूर्वक श्रींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. या गणेशोत्सवानिमित्त सर्वत्र भव्य मंडप उभारण्यात आले असून, विद्युत रोषणाईसह सजावट करण्यात आली आहे.

दरम्यान, सार्वजनिक साखरचौथ गणेश उत्सव मंडळामध्ये श्रीराम सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ, श्री गावदेवी गणेश मित्र मंडळ आणि महिला मंडळ, विघ्नहर्ता सार्वजनिक साखरचौथ गणेशोत्सव, अंकुश परदेशी मित्र मंडळ, नवतरुण गणेश मंडळ, कुंभारपाडा गणेशोत्सव, सार्वजनिक गणेश उत्सव तसेच अन्य मंडळाचा साखरचौथ गणेशोत्सवात सहभाग असल्याची माहिती गणेश उत्सव मंडळांकडून देण्यात आली आहे. साखरचौथ गणेशोत्सव शांततेने, कायदा



आणि सुव्यवस्थेचे पालन करून साजरा करण्याचे आवाहन उरण पोलीस प्रशासनाने केले असून, या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तयारीच्या दृष्टिकोनातून परिश्रम घेत आहेत.

तसेच, चिरनेर गावात सार्वजनिक तसेच घरगुती साखरचौथ गणपतीची संकष्टी चतुर्थीला मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने प्रतिष्ठापना करण्यात येत असून शुक्रवारी येथील मूर्तिकारांची गणेशमूर्तींवर शेवटचा हात फिरविण्याची लगबग सुरू होती.

## मढाळी शाळेला संगणक संच, क्रीडा साहित्य भेट

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील मढाळी बु. शाळेला संगणक संच व क्रीडा साहित्याची भेट देण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

ग्रेगोरियन स्कूलचे फादर फिलिफ व त्यांच्या अर्धांगिनी बिबी टीचर यांच्या माध्यमातून शाळेला संगणक, क्रिकेट हॉलिबॉल, शटल कॉक सेट, टेनिस बॉल, फूटबॉल, दोरी, चेस, कॅरम बोर्ड, लेझिम, लुडो असे विविध इनडोअर व आऊट डोअर खेळाचे साहित्य व आदिवासी भाषेत अनुवाद केलेले दहा पुस्तके भेट स्वरूपात देण्यात आली. यामध्ये ग्रेगोरियन शाळेचे तंत्रस्नेही शिक्षक धनंजय यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेखा कोळी यांनी आपले मत व्यक्त करताना शाळेमध्ये होत असलेली प्रगती व बदलाचे कौतुक केले. तर, श्रीयुत सावंत यांनी शिक्षक हा शाळेचा कणा आहे, त्यामुळे त्यांना नेहमी प्रोत्साहन द्यावे, असे मत मांडले. शाळेची प्रगती उत्तरोत्तर होत राहो, अशा शुभेच्छाही दिल्या.



## पर्यावरणपूरक कार्यक्रमाचे आयोजन



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील जांबरुंग येथे असलेल्या विजयभूमी विद्यापीठाच्या माध्यमातून पर्यावरणपूरक कार्यक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी निसर्ग संवर्धनासाठी वृक्षलागवड केली. तर, शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी स्टील बॉटलचे वितरण करण्यात आले.

विजयभूमी विद्यापीठात 'एक पेड गुरु के नाम' मोहिमेंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कर्जतजवळील जांबरुंग गावात असलेल्या विजयभूमी विद्यापीठात वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. विद्यापीठाच्या झालेल्या या कार्यक्रमात शिक्षा केंद्राच्या विद्यार्थिनी, जांबरुंग येथील पीएनपी शाळेचे विद्यार्थी तसेच मुख्याध्यापक रमेश चंदू पिंगळे आणि जिल्हा परिषद केंद्रशाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत भगत यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात गिर्यारोहक सामाजिक कार्यकर्ते विकास चित्ते यांनी मोहिमेची कल्पना आणि महत्त्व सांगून केली.

या उपक्रमात विजयभूमी युनिव्हर्सिटी जांबरुंगच्या संचालिका कल्पना पडोदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील उज्ज्वला करंभे, ऋषिकेश घाडगे यांनी विद्यार्थ्यांना वृक्षांची माहिती दिली आणि त्यांना वृक्षारोपणात मार्गदर्शन केले.



अलिबाग येथील चावडी मोहल्ल्यात मुस्लीम समाजाच्यावतीने गुरूवारी (दि.१९) ईद-ए-मिलाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अलिबाग उपविभागीय पोलीस अधिकारी विनीत चौधरी, अलिबाग पोलीस ठाण्याचे किशोर साळे यांनी भेट दिली.

## श्रीवर्धनला रंगणार कविसंमेलन

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

कोकण मराठी साहित्य परिषद श्रीवर्धन शाखेच्यावतीने रविवार, दि.२२ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० ते सायं. ४.३० दरम्यान दिलीप पळधे यांच्या निवासस्थानी जिल्हास्तरीय निमंत्रित कवींचे कविसंमेलन व गझल मुशायरा या साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कोमसापचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ हे कार्यक्रमाचे उद्घाटक असून साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य एल.बी. पाटील, जिल्हा समन्वयक अ.वि. जंगम, सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष मनोज गोगटे हे मान्यवर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कविसंमेलनाचे अध्यक्षपद संजय गुंजाळ भूषविणार असून गझल मुशायरा कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्योत्स्ना राजपूत भूषविणार आहेत.

## वावेघर अंगणवाडीतील मुलांना गणवेश वाटप

**। आपटा । वार्ताहर ।**

संवेदना डेव्हलपमेंट फाऊंडेशनच्या समन्वयाने आणि डॉ. विदुला सोमण यांच्यातर्फे अंगणवाडीतील ३२ मुलांना शालेय गणवेश, दप्तर आणि खाऊचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम बुधवारी (दि.१८) पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अंगणवाडी सेविका आशा माळी यांनी डॉ. विदुला सोमण, मोहिनी बागडे आणि इंदू खुडे यांचे पुष्पगुच्छ आणि शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले. यानंतर फाऊंडेशनच्या मोहिनी बागडे यांनी मुलांना चांगल्या सवयी आणि गुड टच-बॅड टचविषयी मार्गदर्शन केले. याविषयी बोलताना मुलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाला पालकांचीसुद्धा उपस्थिती होती.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- घरात घरकाम व मुलाची देखभाल करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८५६५५५.
- घरकाम व मुलांना सांभाळणेसाठी बाई हवी आहे. ठिकाण : पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ७-३०/८ ते ५ संपर्क :९८६७२१५४९५/९४२२३७५१२४
- रिसॉर्ट वर कामासाठी जोडपं पाहिजे आहे. संपर्क- ९६०७१०२३५७, ठिकाण- सासवणे.
- अलिबागमधील नामांकीत मोटार ट्रेनिंग स्कुलसाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क : 9823492626/7998619191
- LIC Office विजयनगर वरसोली येथे ऑफीस कामासाठी मुलगी पाहिजे. संपर्क :७५०७९२९१२८/९४२२४९४५९०
- अलिबाग-मुंबई हायवेवर पिंपळभाट येथे ३००० स्क्वे. फूट, हॉल/जागा ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. गरजूंनी अथवा इच्छुक एजंटने संपर्क करावा. संपर्क- ९२२६३७९८४४/९८२३९२७२८८
- शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी ५० शाखा वेबसाईट संपर्क : ९९२६७६६१२९
- जन्मकुंडली, हस्तरेषा, टॅरोकार्ड, अंकशास्त्र, वास्तूशास्त्र, रत्नशास्त्र, वेलनेस ज्योतिषालय, ९२२६७६६१२९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## पहिली नॉन-सर्जिकल कार्डियाक प्रक्रिया यशस्वी

# हृदयविकाराच्या रुग्णाला दिले जीवदान

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

**अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये ४६ वर्षे वयाच्या रुग्णावर सायनस वेनोसस ॲट्रिअल सेप्टल डिफेक्ट (एएसडी) स्टेन्टिंग करून त्यांचे प्राण वाचवले. मुंबई आणि नवी मुंबईमध्ये अशाप्रकारची प्रक्रिया पहिल्यांदाच करण्यात आली आहे. जन्मजात हृदय विकारांवर उपचार करण्यात हे एक अतिशय महत्त्वाचे पुढचे पाऊल उचलून, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने गुंतागुंतीचे व गंभीर हृदयविकार असलेल्या रुग्णांना नवी आशा प्रदान केली.**



मुंबईच्या पश्चिम उपनगरामध्ये राहणारे ४६ वर्षांचे सुनील यांच्या नियमित आरोग्य तपासणीमध्ये एक धक्कादायक बाब आढळून आली. ईजीसी सामान्य नव्हता, त्यामुळे पुढील तपासण्या केल्या आणि लक्षात आले की त्यांच्यामध्ये पार्शियल अनोमल्स पल्मनरी वेनस कनेक्शन (पीएपीव्हीसी) सह मोठा सायनस वेनोसस ॲट्रिअल सेप्टल विकार होता आणि तो बरीच वर्षे लक्षातच आला नव्हता. सर्व एएसडी केसेसपैकी ५ टक्क्यांमध्ये सायनस वेनोसस एएसडी आढळते. एकावेळी जन्मलेल्या दर १५०० पैकी फक्त एकामध्ये हा विकार असू शकतो. हे अनपेक्षित निदान करण्यात आल्याने सुनील आणि त्यांच्या कुटुंबाला मोठा धक्का बसला. पण यामुळे अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये प्रगत उपचारांचा मार्ग खुला झाला.

सुनील (रुग्ण) म्हणाले की, एप्रिलमध्ये नियमित हेल्थ चेकअप करून घेतली आणि त्यामध्ये माझे पुढचे अवघे आयुष्य बदलवून टाकणारी समस्या आढळून येईल अशी मी कधी कल्पनादेखील केली नव्हती. तपासणीदरम्यान माझ्या हृदयामध्ये काही गडबड आहे असे जाणवले. त्यासाठी पुढील तपासण्या करून घेतल्या, तेव्हा लक्षात आले की माझ्या हृदयात छिद्र होते. एका डॉक्टरांनी विशेषज्ञ डॉ. भूषण चव्हाण यांना दाखवण्याचा सल्ला दिला. डॉ. भूषण यांनी मला एएसडी स्टेन्टिंग करून घेण्याचा सल्ला दिला. ते केल्यानंतर माझी तब्येत सुरळीतपणे बरी झाली, माझे सध्याचे आरोग्य त्यांचे नैपुण्य दर्शवणारे आहे. मी पूर्णपणे बरा झालो आहे, माझे काम पुन्हा करू लागलो आहे आणि कोणत्याही अडथळ्यांविना सर्वसामान्य आयुष्य जगत आहे.

कार्डियाक देखभालीमध्ये नवक्रांती घडवून आणणारे नाविन्यपूर्ण उपचार २९ जुलै रोजी सुनील यांनी पेडियाट्रिक कार्डिओलॉजीचे सिनियर कन्सल्टन्ट डॉ. भूषण चव्हाण यांच्या तज्ज्ञ देखभालीखाली उपचार घेण्यास सुरुवात केली. हे मिनिमल इन्वेसिव तंत्र अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईतील अत्याधुनिक कॅथ लॅबमध्ये करण्यात आले.

> सायनस वेनोसस एएसडीच्या रुग्णांसाठी ही एक खूप मोठी प्रक्रिया आहे. खासकरून ज्यांच्यावर पारंपरिक सर्जरी केली जाऊ शकत नाही अशा रुग्णांसाठी ही प्रक्रिया खूप उपयुक्त आहे. या केसमध्ये आम्हाला मिळालेले यश क्लिनिकल उत्कृष्टतेप्रती तसेच नाविन्यपूर्ण व कमी इन्वेसिव तंत्रांचा वापर करून रुग्णांना अधिक सुधारित परिणाम मिळवून देण्याप्रती आमची वचनबद्धता दर्शवते. प्रत्येक रुग्णाच्या जीवनाची गुणवत्ता उंचावतील असे जीवनरक्षक उपचार पुरवणे हा आमचा उद्देश आहे. हा रुग्ण फक्त दोन दिवसांत घरी जाऊ शकला. त्यांना फक्त एक साधे अँटीकोग्युलेशन औषध घ्यायचे आहे.
>
> – डॉ. भूषण चव्हाण
> सिनियर कन्सल्टन्ट, पेडियाट्रिक कार्डिओलॉजी, अपोलो हॉस्पिटल, नवी मुंबई

## बीच क्रिकेट आणि मंगोलियन कुस्ती

क्रिकेटचं एक मैदान असतं. या खेळाचे नियमही ठरलेले असतात. पण या खेळाला ऑस्ट्रेलियात गमतीशीर ट्विस्ट देण्यात आलं आहे. इथे बीच म्हणजे समुद्र किनाऱ्यावर क्रिकेट खेळलं जातं. याला ‘बीच क्रिकेट’ म्हणतात. खरं तर क्रिकेट खेळणाऱ्या कोणत्याही देशात हा प्रकार पहायला मिळेल. तुम्ही मुलं समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेल्यावर मस्तपैकी क्रिकेट खेळत असाल. हे बीच क्रिकेटही तसंच काहीसं आहे. बीच क्रिकेट खेळताना नेहमीच्या लेदर बॉलऐवजी टेनिस बॉल वापरला जातो. बॉल पाण्यात पडला तर फलंदाजाला बाद ठरवलं जातं. काही वेळा पाण्यात उभे असणारे खेळाडू चेंडू खूप छान पद्धतीने झेलतात. क्रिकेट स्टंप म्हणून इथे कशाचाही वापर केला जातो. स्टंपच्या जागी दगड किंवा डबेही ठेवले जातात. वाळूवर टप्पा पडत नसल्याने फलंदाजाच्या दिशेने चेंडू थेट फेकावा लागतो. विशेष म्हणजे ऑस्ट्रेलियात बीच क्रिकेटच्या व्यावसायिक स्पर्धाही भरवल्या जातात. इंग्लंड, न्यूझीलंडसारखे देशही यात सहभागी होतात.



मंगोलियात मंगोलियन कुस्ती हा खेळ खेळला जातो. एकेकाळी मंगोलियन वंशाच्या लोकांनी जगातल्या बऱ्याच मोठ्या भूभागावर राज्य केलं होतं. म्हणूनच हा या देशाच्या परंपरेचा एक भाग आहे. या खेळात तुम्हाला प्रतिस्पर्ध्याला लोळवायचं असतं. पाय वगळता खेळाडूच्या शरीराचा कोणताही भाग जमिनीला लागला की तो हरतो. जगभरातल्या मंगोलियन लोकांमध्ये ही कुस्ती खूपच लोकप्रिय आहे. मुलगा जन्माला आला तर त्याने कुस्तीपटू व्हावं अशी इथल्या लोकांची इच्छा असते. इथे प्रतिस्पर्ध्याला खूप मान दिला जातो. जिंकल्याचा आनंद साजरा करण्याआधी प्रतिस्पर्ध्याला आधार द्यावा लागतो. ही इथली पद्धतच आहे.

फन टाईम

## व्हायरस घालवण्यासाठी...

छोट्या दोस्तांनो, स्मार्टफोन, कॉम्प्युटरमध्ये व्हायरसच्या घुसखोरीचा धोका बराच जास्त असतो. गुगल प्ले स्टोअरवरून काही ॲप्स डाउनलोड केल्यामुळे फोनमध्ये व्हायरस येऊ शकतो. यामुळे तुमचा डाटा लोकांपर्यंत पोहचू शकतो. माहितीची गोपनीयता धोक्यात येऊ शकते. फोन मंद गतीने काम करू लागला की त्यात व्हायरस आला आहे असं समजावं. पण यामुळे घाबरून जाण्याचं कारण नाही. फोनमधले हे व्हायरस अगदी सहज काढता येतात. त्यासाठी काय करता येईल? जाणून घेऊ या.

**पद्धत क्रमांक १**

स्मार्टफोनचा सेफ मोड सुरु करण्यासाठी पॉवर बटण बराच वेळपर्यंत दाबून धरावं लागेल. आता पॉवर ऑफचा ऑप्शन निवडला की तुमचा फोन सेफ मोडमध्ये जाईल.




**पद्धत क्रमांक २**

पॉवर बटण दाबून फोन ऑफ करू शकता. यानंतर पुन्हा पॉवर बटण दाबा. फोनच्या कंपनीचा लोगो येईपर्यंत हे बटण दाबून ठेवा. लोगो आल्यावर व्हॉल्यूम बटण खालच्या बाजूने दाबा. यानंतर फोनच्या स्क्रीनवर खालच्या बाजूला सेफ मोड हे शब्द दिसतील.

स्मार्ट टिप्स

व्हायरस काढून टाकण्यासाठी सेटिंग्जमधून ॲप्समध्ये जा. इथे डाउनलोड हा पर्याय निवडा. आता फोनमधली सगळी ॲप्स दिसतील. यापैकी तुम्ही डाउनलोड केलेली ॲप्स कोणती आहेत ते बघा. या यादीत भलतंच एखादं ॲप दिसलं तर अनइन्स्टॉल करून टाका. यामुळे फोनमधला व्हायरसही निघून जाईल.

सेफ मोडमधून बाहेर पडण्यासाठी फोनचं पॉवर बटण दाबून रिस्टार्टचा पर्याय निवडा.

या नंतरही फोनचा वेग वाढला नाही तर फॅक्टरी रिसेटचा पर्याय आहे. पण याआधी फोनमधली महत्त्वाची माहिती, फोन नंबर, फोटो, व्हिडिओ हे सगळं नीट सेव्ह करून ठेवा. फॅक्ट्री रिसेट केल्यानंतर तुम्हाला हवी असणारी ॲप्स पुन्हा डाउनलोड करावी लागतील.

## कुत्र्यांशी कसं वागायचं?

छोट्यांनो, आपल्याला पाळीव प्राणी खूप आवडतात. त्यातही कुत्रा दिसला की आपण त्याच्या जवळ जातो. मित्रमैत्रिणींच्या घरी कुत्रा पाळला असेल तर त्याच्याशी खेळतो. रस्त्यावरच्या कुत्र्यांपैकी एखादा कुत्रा आपल्या जवळ येतो. आपण त्यालाही हात लावतो. पण मित्रांनो, कुत्रा इमानदार प्राणी असला तरी अनोळखी व्यक्तीला तो चावू शकतो हे लक्षात घ्या. त्यामुळे अनोळखी कुत्र्याशी वागताना काळजी घ्यायला हवी.



✻ कुत्र्याला चिडवू नका. चिडवल्यामुळे तो वैतागतो. राग आल्यानंतर तो अंगावर धावून येऊ शकतो. धोका वाटला तर चावा घेऊ शकतो. त्यामुळे तुमचा खोडकरपणा अंगाशी येऊ शकतो हे लक्षात घ्या. कुत्र्यापुढचं अन्न किंवा खेळणं दूर नेऊ नका.

✻ मालकाच्या परवानगीशिवाय कोणत्याही पाळीव कुत्र्याशी जवळीक करू नका. काही वेळा डॉगीला अनोळखी लोकांचा स्पर्श आवडत नाही. या धर्तीवर भटक्या कुत्र्यांच्या जवळ तर अजिबात जाऊ नका.

✻ काही कुत्र्यांना फार जवळीक आवडत नाही. तुम्ही मुलं गोंडस कुत्रा बघून त्याच्या जवळ जाता. कुरवाळता. पण यामुळे घाबरून तो चावा घेऊ शकतो. उगाचच हात लावला म्हणून त्याला रागही येऊ शकतो.


✻ काही कुत्र्यांना एखाद्याचा पाठलाग करून चावायला आवडतं. कुत्र्यांच्या जवळून धावत जाणाऱ्यांच्या अंगावर ते जोरात भुंकतात. त्यांचा पाठलाग करतात. त्यामुळे आसपास कुत्री असतील तर धावू नका. शांतपणे चालत जा. विशेषत: त्यांच्याजवळ जाताना अजिबात धावू नका. अनोखळी कुत्रा तुमच्याजवळ धावत येत असेल तर एका जागी शांत उभे रहा. तो पुढे येऊ लागला तर हळूहळू मागे जा.

हेल्थ वेल्थ

✻ कोणताही कुत्रा चावू शकतो हे कायम लक्षात ठेवा. आपला कुत्रा चावत नाही असं अभिमानाने सांगणाऱ्यांच्या कुत्र्यांनीही काहींना चावा घेतलेला असतो. त्यामुळे परिचय झाल्याशिवाय योग्य अंतर राखा. कुत्र्यांना राग येईल असं काहीही करू नका. झोपलेल्या कुत्र्यांना त्रास देऊ नका.

## अनोख्या इमारती

स्पेनमध्ये ‘वॉटर बिल्डिंग रिसॉर्ट’ नावाची एक इमारत आहे. इथे हवेचं पाण्यात रूपांतर होतं. ही कोणतीही जादू नाही मित्रांनो! तर सौरऊर्जेमुळे हे शक्य झालंय. यासोबतच या इमारतीत पावसाचं पाणी साठवण्याची सोय आहे. जमिनीखालच्या पाण्यावर प्रक्रिया करण्याची सोयही आहे. या इमारतीचा आकारही पाण्याच्या थेंबासारखा आहे. दोस्तांनो, ही इमारत म्हणजे एक हॉटेल आहे.



✻ न्यू मेक्सिकोमध्ये स्पेसपोर्ट अमेरिका’ नावाची इमारत आहे. अंतराळ प्रवासाला जाणाऱ्यांचा विचार करून या इमारतीची रचना करण्यात आली आहे. या ठिकाणी अंतराळा विषयीची रंजक माहिती मिळू शकते.

✻ दुबईतली ‘द थ्री ग्रेसेस’ ही शिल्पकृती अनोखी अशी आहे. हे शिल्प सौंदर्य आणि आनंदाचं प्रतिक आहे. याची रचना एखाद्या गेटसारखी आहे.

✻ ‘लिंक्ड हायब्रिड’ हे बीजिंगमधलं बिल्डिंग कॉम्प्लेक्स आहे. २२३ फूट उंचीच्या या इमारतीमध्ये ६४४ अपार्टमेंट्स आहेत. २००९ मध्ये या इमारतीला सर्वोत्कृष्ट उंच इमारतीचा पुरस्कारही मिळाला आहे.

✻ ‘सायबरटेक्चर’ ही इमारत मुंबईत आहे. याची रचना फारच आकर्षक आहे. इमारत अंडाकृती आहे. ही इमारत एका कंपनीचं कार्यालय आहे.



सिमेंट, स्टील आणि काच यांच्या वापराशिवाय ही इमारत तयार करण्यात आली आहे.

छोटे उस्ताद

✻ स्वित्झर्लंडमधलं ‘वॉटरफ्लक्स आर्ट म्युझियम’ चित्रविचित्र आकाराच्या इमारतीमुळे जगभरात लोकप्रिय आहे. या इमारतीची रचना फ्रान्सच्या आर्किटेक्टने केली आहे. ही इमारत एखाद्या विचित्र प्राण्याच्या घरासारखी वाटते.

दोस्त हे मस्त

## छोटीशी गोगलगाय

बोर्नेओ ही गोगलगायीची सर्वात लहान प्रजाती असून ती चीनमध्ये आढळते. तिच्या पाठीवर चमकणारं, पारदर्शक पांढऱ्या रंगाचं कवच असतं. हा प्राणी इतका छोटा आहे की संशोधकांना तो साध्या डोळ्यांनी दिसला नाही.



त्यामुळे या भागातली माती घेऊन ती मायक्रोस्कोपखाली ठेऊन त्यांनी या दुर्मीळ प्रजातीचा अभ्यास केला.

खादाडी

## बटाट्याचं भरीत

छोट्यांनो, तुम्ही वांग्याचं भरीत खाल्लं असेल. आता बनवण्यास अगदी सोपं असलेलं बटाट्याचं भरीतही



करुन बघा. यासाठी दोन बटाटे उकडून घ्या. एका भांड्यात कुस्करून घ्या. त्यात दही घाला. भरीत फार पातळ करू नका. त्यानंतर त्यात मीठ, हिरव्या मिरचीचे तुकडे आणि थोडी कोथिंबीर घाला. जेवताना या चटपटीत डिशचा आनंद घ्या.

लाईफस्टाईल

## शॉवर वापरताय?

मुलांनो, गंमत म्हणून तुम्ही शॉवरखाली आंघोळ करता का? याचं उत्तर होकारार्थी असेल तर सावध व्हा. चुकीच्या पद्धतीने शॉवर वापरला तर बरेच आजार होऊ शकतात. व्यायाम केल्यानंतर किंवा भरपूर खेळून आल्यावर शॉवरखाली उभं राहू नका. यामुळे त्रास होऊ शकतो. शॉवर वापरण्याआधी स्वच्छ करून घ्या.



योगा टाईम

## अग्निसार क्रिया

अनेकांना पोटात गॅस होण्याची समस्या असते. लहानग्यांनाही अपचन, गॅससारखे विकार होतात. त्यावर अग्निसार क्रिया हा रामबाण उपाय ठरू शकतो. ही क्रिया करण्यासाठी मांडी घालून बसा. दीर्घ श्वास घ्या आणि सोडा. श्वास सोडल्यानंतर पोट आतल्या बाजूला ओढा. नंतर सैल सोडा. यावेळी श्वास थांबवून ठेवा. पोट पुढे-मागे करताना स्नायू दुखू लागले किंवा श्वास रोखता येत नसेल तर पोट सैल सोडून उभे रहा आणि श्वास घेत रहा. थोड्या वेळाने पुन्हा ही क्रिया करा.




## ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) भारतातल्या धवलक्रांतीचे जनक कोणाला म्हणतात?
२) भारतातलं सर्वाधिक वनसंपदा असणारं राज्य कोणतं?
३) केशराचं उत्पादन घेणारं भारतातलं एकमेव राज्य कोणतं?
४) सर्वाधिक जिल्हे असणारं देशातलं राज्य कोणतं?
५) लक्षद्विप किती बेटांचं मिळून बनलं आहे?
६) ‘इंद्रावती’ ही कोणत्या नदीची उपनदी आहे?
७) जगातला सर्वात मोठा खंड कोणता?
८) जगातला सर्वात मोठा समुद्र कोणता?
९) सर्वात उंचावरचा तलाव कोणता?
१०) जगातला सर्वात मोठा गोड्या पाण्याचा तलाव कोणता?

उत्तरं : १) व्ही. कुरियन २) मध्य प्रदेश ३) जम्मू-काश्मीर ४) उत्तर प्रदेश ५) ३६ ६) गोदावरी ७) आशिया ८) भूमध्य समुद्र ९) टिटिकाना( पेरू) १०) लेक सुपिरिअर (अमेरिका-कॅनडा)

ठिपके जुळवा



## निसर्गसंपन्न स्कॉटलंड

‘यु’नायटेड किंग्डम’चा भाग असणारा स्कॉटलंड हा पश्चिम युरोपमधला देश. एडिनबर्ग ही या देशाची राजधानी. अत्यंत सुंदर असा स्कॉटलंड हिरवाईने नटलेला आहे. या देशात घनदाट जंगलं, उंचच उंच डोंगररांगा आणि निळ्या पाण्याचे तळी पहायला मिळतात. निळाशार समुद्र ही स्कॉटलंडची शान आहे. स्कॉटलंड हे विविध प्रजातीचे प्राणी, पक्षी आणि जलचरांचं माहेरघर आहे. बाराशे वर्षांपूर्वीपासून इथे माणसांनी वस्ती करायला सुरुवात केल्याचे पुरावे आढळतात. इथल्या लोकांना स्कॉटिश म्हटलं जातं. त्यांनी विविध संकल्पना रूढ केल्या, बरेच शोध लावले. स्थापत्यशास्त्राशी संबंधित नवं तंत्रज्ञान विकसित केलं. टेलिफोन,




टेलिव्हिजन, वाफेचं इंजिन, ॲनेस्थेशिया, पेनिसिलिन आणि सायकल यांचा शोध लावणारे संशोधक स्कॉटिश होते. स्कॉटलंडने बरेच खेळाडूही घडवले. इथल्या ॲथलिट्सनी ऑलिम्पिकमध्ये पदकं जिंकली. जगविख्यात टेनिसपटू अँडी मरे स्कॉटलंडचाच. स्कॉटलंडचे काही लेखक आणि कवीही जगप्रसिद्ध आहेत. त्यामुळे या देशाने अनेक थोर व्यक्तिमत्त्वं घडवली असं म्हणता येईल. स्कॉटलंडच्या दक्षिणेला इंग्लंड आहे. १८५० ते १९५० या काळात स्कॉटलंडमध्ये जहाजबांधणी उद्योगाने खूप प्रगती केली. यासोबतच इथे कोळसा, स्टील आणि लोखंडाचा उद्योगही चांगलाच वाढला होता. सद्यस्थितीत अपारंपरिक ऊर्जा, पर्यटन आणि इतर उद्योग-व्यवसाय स्कॉटलंडच्या अर्थव्यवस्थेचा कणा बनले आहेत.

सफर देशांची

## कौशल्य विकसित करा

सध्या बारावीनंतरच बऱ्याच व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो. छोटे छोटे अभ्यासक्रम पूर्ण करून नोकरी मिळवता येते. स्वतःचा उद्योगही सुरू करता येतो. त्यामुळे ग्रॅज्युएट झाल्यानंतर पोस्ट ग्रॅज्युएशन करावं का, असा प्रश्न पडला तर ही माहिती लक्षात घ्या.

✻ बरेच लोक पदवी नसतानाही आपापल्या क्षेत्रात यशस्वी होताना दिसतात. अंगभूत कौशल्यामुळे तुम्ही पुढे जाऊ शकता. उच्च शिक्षण घ्यायचं किंवा नाही हे तुम्ही निवडलेल्या क्षेत्रावर ठरतं. जसं की चित्रपट दिग्दर्शन किंवा कलेच्या क्षेत्रात पदवीपेक्षा कौशल्य उपयोगी पडतं.




✻ मास्टर्स पदवी मिळवल्यानंतर तुम्हाला त्या एका क्षेत्रातच करीअर करावं लागतं. तुमच्याकडील पदवीच्या माध्यमातून नोकरी मिळवता येते. पण एखादं क्षेत्र पसंतीचं नसलं तरी तुम्हाला त्यातच पुढे जावं लागतं. दुसऱ्या क्षेत्रात करीअर करण्यासाठी पुन्हा नव्याने सुरुवात करावी लागते. त्यामुळे मास्टर्स करण्याआधी खरंच त्या विषयात रुची आहे का, ते ओळखा.

✻ आपल्या देशात उच्च शिक्षण घेण्यासाठी बराच खर्च करावा लागतो. त्यामुळे कोणत्याही अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याआधी त्याच्या उपयुक्ततेबद्दल जाणून घ्या. करिअरच्या दृष्टीने या अभ्यासक्रमाचा काही फायदा होणार असेल तरच प्रवेश घ्या.

✻ कॉर्पोरेट जगतात पदव्यांपेक्षा ज्ञान आणि कौशल्याला जास्त महत्त्व दिलं जातं. काही वेळा पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होणारी मुलं स्पर्धेत मागे पडतात तर कौशल्याच्या बळावर कमी गुण मिळवणारे विद्यार्थी पुढे निघून जाताना दिसतात. त्यामुळे फक्त पदवी मिळवण्यापेक्षा कौशल्यं विकसित करण्यावर भर द्या.

कोण होणार?

चित्र रंगवा



## स्मरणशक्ती वाढवण्यासाठी...

छोट्या दोस्तांनो, स्मरणशक्ती प्रत्येकासाठीच महत्त्वाची असते. तुमची स्मरणशक्ती तीक्ष्ण असेल तर सगळा अभ्यास लक्षात राहतो. नाही तर पाठ केलेलं सगळं विसरून जायला फारसा वेळ लागणार नाही. म्हणजेच स्मरणशक्ती हे माणसाला मिळालेलं वरदान आहे. म्हणूनच स्मरणशक्ती वाढवण्यासाठी सतत प्रयत्न करत रहायला हवेत. थोडे प्रयत्न केले तर आपण अनेक गोष्टी लक्षात ठेऊ शकतो. माझ्या काही लक्षातच राहत नाही, असं तुम्हाला वाटत असेल तर काळजी करू नका. स्मरणशक्ती सुधारण्यासाठी मेंदूला खाद्य पुरवायला हवं. बदामासारखे पौष्टिक पदार्थ खायला हवेत. सोबतच मेंदूला व्यायामही मिळायला हवा. तुमची स्मरणशक्ती सुधारण्यासाठी एक खास वेबसाइट आहे. किड्स मेमरी डॉट कॉम असं या वेबसाइटचं नाव. या साईटला भेट देऊन तुम्ही त्यावरचे गेम्स खेळू शकता. या गेम्समुळे तुमच्या मेंदूला चालना मिळू शकेल.



‘मेमरी मॅच’ या गेममुळे तुमच्या स्मरणशक्तीत टप्प्याटप्प्याने सुधारणा होईल. या गेममध्ये ११ पातळ्या आहेत. प्रत्येक पातळीवर गेम कठिण होत जातो. या गेममध्ये तुम्हाला दोन सारख्या चित्रांच्या जोड्या जुळवायच्या आहेत. जोड्या जुळवण्यासाठी ठराविक वेळ देण्यात आली आहे. कोणतं चित्र कुठे आहे, हे लक्षात राहायला हवं. हा खेळ दररोज खेळल्यास स्मरणशक्तीत सुधारणा झाल्याचं तुमच्या लक्षात येईल.

स्टडी टिप्स

‘नंबर स्क्रॅम्बलर’ या गेममुळे तुम्हाला फोन नंबर, पासवर्ड, स्पेलिंग, रस्त्यावरच्या खुणा अशा विविध गोष्टी लक्षात ठेवणं सोपं जाईल. पूर्वी फोन नंबर लक्षात ठेवले जायचे. पण आता स्मार्टफोनमुळे जवळच्या व्यक्तींचा नंबर लक्षात ठेवणंही कठिण होऊन बसलंय. स्मार्टफोन हरवला तर काय करायचं, असा प्रश्न आहेच. पण या साईटवरच्या विविध गेम्समुळे तुमचा प्रश्न सुटू शकेल. पण यासाठी प्रयत्न करायला हवेत बरं का!




# एक उनाड दिवस



**मुळात मित्रमंडळींचा मोठा फौजफाटा कायम बाळगून असण्याची सवय असल्याने खरंच काहीही पूर्वतयारी न करता घालवलेल्या मजेशीर उनाड दिवसांच्या अनेक रम्य आठवणी माझ्या गाठीशी जमा आहेत. त्यात रमणे हे आनंदाचे निधान आहे. माझ्या त्यातीलच एका उनाड दिवसाची आठवण आज अचानक मनात रुंजी घालू लागली आहे. वर्ष लोटली अनेक परंतु आजही तो आनंद जसाच्या तसा जाणवला बघा.**

**वर्षा कुवळेकर**

कॉलेजवयीन असतानाची ही गंमत. आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धांना अलिबाग कॉलेज तर्फे मुले आणि मुलींच्या दोन संघातून नुकतीच मुंबई ट्रीप करून आम्ही आलो होतो. साधारण दोनतीन दिवस असे खेळण्यासाठी एकत्र घालवले की मन त्यातून पटकन बाहेर यायला तयार होत नाही. उत्साह, टीमवर्क, धमाल याचे एक अजब गारूड मनावर पसरलेले असते. त्याच भरात स्पर्धा संपवून लाँचने अलिबागला परतत असताना आपण सगळे लगेच एक सहल करू अशी टूम निघाली. आमच्या बरोबर असणारे प्रोफेसर ही सहमत झाले. आणि त्याच प्रवासात उद्याच आपण सागरगडावर जाऊ यावर शिक्कामोर्तब झाले. सगळ्यांचा उत्साह वाढवणारा हा बेत होता.

रायगड जिल्ह्यात अलिबाग पासून पाचसहा किलोमिटर्स वर असणारा हा गड ऐतिहासिक महत्व बाळगून आहे. शिवाजी महाराजांनी आदिल शहाकडून हा जिंकून पुन्हा स्वराज्यात घेतला. पुरंदरच्या तहात हा मुघलांच्या ताब्यात गेला होता. हा गड धरमतर खाडी आणि एकूण सागरी सीमा यावर लक्ष देण्यासाठी बांधला गेला होता. माहिती समजली होती परंतु कधीच जाणे झाले नव्हते. आश्चर्य म्हणजे शाळेतून ही कधी सहल नेली नव्हती. नाहीतर कर्नाळा, रायगड, सिंहगड अशा गड किल्ल्यांची ओळख शाळेमुळेच होते.



खरंतर तीन दिवस कबड्डी खेळून आम्ही सगळेच दमलो होतो पण त्याचा मागमूस सुध्दा पहाटे राहिला नाही आणि तयारीला लागलो. आम्ही मुलींनी आईकडून डबा करून घेतला. आमच्या दोघीतिघी सख्या हॉस्टेलवर राहणाऱ्या. त्यांची जबाबदारीही आनंदाने आईने घेतली. आमची एक सखी नेहमी दहीभात सुद्धा घेते. ती एकटीच तो घेत असल्याने बरोबर असणाऱ्यांनाही तो मिळेल याची तिच्या आईला तयारी ठेवावी लागते. सकाळी लवकर अलिबाग एस टी स्टँडवर सगळे जमलो आणि खंडाळा गावात उतरलो. तिथून चालत जायचे ठरवले. जवळपास १६/१७ तरुण मुले आणि एक सर हसत खिदळत, गप्पांच्या नादात गडावर निघालो. इथे व्यवस्थित बांधलेल्या पायऱ्या नाहीत त्यामुळे पायवाटेने रस्ता करत चालावे लागते. अर्थातच लहानमोठी वृक्षराजी, अमाप वेली झाडाभोवती गुंडाळलेल्या, झुडुपे पायात येणारी. अगदी खरा डोंगर चढत जाण्याचा अनुभव. काही ओळखीची काही अनोळखी झाडे. रानफुले न्याहाळत डोंगर चढून तर हा हा म्हणता गेलो. गड चढून वर गेल्यावर सिद्धेश्वर मंदिर लागते. तिथे एक बाबा कायमचे वस्तीला असतात हे ऐकले होते. उन्हाळा, हिवाळा, पावसाळा, कोणताही ऋतू असो, बाबा तिथेच राहत, छोटासा मठच म्हणा ना! डोंगरावरून जोराने येणारे पाणी मंदिराच्या भिंतीला लागूनच खाली येते. तोच प्रसिद्ध मोठा सिद्धेश्वर धबधबा. अर्थात हा धबधबा आपले अस्तित्व फक्त पावसाळ्यात दाखवतो. एरवी वर्षभर नुसता काळा पाषाण. पावसाळ्यात मात्र सहलीचा आनंद खास धबधबा प्रेमींना मिळतो.

माथा चांगलाच ऐसपैस रुंद पसरलेला आहे. वारा प्यायल्यासारख्या उधळलो आम्ही. सगळा गड पिंजून काढला. प्रत्येक बाजूने दिसणारे विहंगम दृश्य मनात साठवले. धरमतरची खाडी उंचावरून कशी दिसते हे पाहून भारी वाटले.

डोंगरावर मोठमोठ्या करवंदीच्या जाळ्या आहेत. करवंदाची झाडे अनेकदा पाहिली होती. अगदी काट्यांनी हात ओरबाडून घेऊन कच्ची, पिकलेली करवंदे खूपदा खाल्ली होती. टोपलीत विकायला आलेली करवंदे खाण्यापेक्षा अशी जास्त गोड लागतात, हा ही स्वानुभव होता. तरीही या डोंगरावर पहिल्या तशा जाळ्या मी कधीच पाहिल्या नव्हत्या. आत शिरुन पाहू या असा दणकून विचार मनात आला. चला, चला असा हाकारा केला, तेव्हढ्यात मुलांनी एकमेकांना खाणाखुणा केल्या असाव्यात. कारण एकदम म्हणायला लागले, हं, जाऊ या, पण एक सांगतो हं, एव्हढ्या मोठ्या जाळीत वाघ पण असू शकेल बरं का. शांत असतं ना आत, त्यामुळे आराम करायला आत बसतात ते.

हे ऐकल्याबरोबर सगळ्यांचे मोहरे वळले. एकीचीही हिम्मत नाही. नंतर, नाहीये वाघ, गंमत केली. जरा हिम्मत बघितली जेएसएमच्या मुलींची. अशा खूप विनवण्या झाल्यावर भीती वाटत असताना हळूच आम्ही त्या जाळ्यांमधून डोकावलो. आतील गर्द सावली आणि थंडावा मोहक वाटला तरी तिथे बसण्याचे धाडस आमच्यात नव्हते. याच बरोबर एक नवी माहिती मुलांनी सांगितली. या गडावर भाकड झालेल्या म्हशी आणि उपयोगी नसलेले रेडे असेच सोडून दिले जात. मालक नाही, वाऱ्यावर सोडलेली ही गुरे कळपाने राहत आणि आपली उपजीविका गडावर उपलब्ध असलेल्या मुबलक गवत, झुडुपे यावर करत. अशीच सोडलेली असल्याने मुळातली ही पाळीव जमात आता जवळपास रानटी झाली आहेत. निसर्गाचा नियम आहेच. Survival of the fittest. गडावर खरंच बिबटे येतात. त्यांच्या हल्ल्यांना पुरून उरण्यासाठी त्यांच्यात हे बदल झाले असावेत. जरा धडकी भरवणारीच ही माहिती मिळाल्यावर आम्ही एकटीने चार पावलेही दूर जाणे टाळले. असो.

सागर गडावर आम्हाला मुबलक प्रमाणात एक विशिष्ट फळ, ज्याला कोकणात आळू म्हणतात त्याची झाडे दिसली. खूप मोठ्या प्रमाणावर ही झाडे पाहायला मिळाली. काळसर रंगाचे आंबटगोड चवीचे हे फळ मी खाल्ले होते आणि आवडले ही होते. ज्यांना आवडते त्यांना खूप आवडते नाहीतर अजिबात तोंड देखील लावणार नाहीत असेही महाभाग या फळाच्या बाबतीत मी पाहिले आहेत. आम्ही मुलींनी एकदा फ्रूट सॅलड करायचा बेत केला तेव्हा काही विचार न करता हे फळ ही चिरून घातले. तो मात्र फारसा बरा अनुभव नव्हता. असो. एकगठ्ठा इतकी झाडे आणि त्याला आलेली कच्ची फळे पाहून छानच वाटले. एक नवीन ओळख झाली या फळाची.

झाडाखाली सावलीचे मोक्याचे ठिकाण शोधून अंगतपंगत बसली. अनेक चवी चाखून पाहिल्या. व्हेज, नॉनव्हेज पदार्थ होते. काही मुलांनी सुके मासे आणले होते, सुकटीची चटणी वगैरे नावे प्रथमच समजली. गप्पांची सत्रे झाली. मौजमजा करत जेवण झाले. थोडावेळ हात वाळवत तिथेच टाईमपास झाल्यावर आमचा अत्यंत थरारक बेत तडीला नेला. मुलांच्या टीम मधील एकाने त्याच्याकडील २२ रायफल आणली होती. आज गडावर शूटिंग करू या हे त्याने सुचवले होते. साग्रसंगीत तयारी तो घेऊन आला होता. एका बाजूला मुलांनी त्याची मांडणी केली. अंतर निश्चित केले. बुल्स आय कागदावर आखून झाडावर टांगले. एन सी सीत रायफल शूटिंग केले होते त्यामुळे बेसिक्स माहिती होते. खूप महिन्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी उत्सुक होतो. अर्थात रायफल ठेवण्यासाठी योग्य अशी वाळूची पोती वगैरे नव्हती. आधी मुलींनी शूटिंग करू या ठरले. मुले मदतीला होती. त्याप्रमाणे आम्ही फायरिंग केले, पण खांदे चांगलेच दुखले. फायर झाल्यावर मागे येताना बंदूक दाणकन आपटते (recoil) तो धक्का झेलायला खांद्याशिवाय दुसरे साधन नव्हते. तरूण वयाचा फायदा हाच की अशा छोट्या मोठ्या गोष्टींचा बाऊ केला जात नाही अजिबात. तो ठरवलेला इव्हेंट पूर्ण व्हावा यासाठी मनाची सगळी ताकद लागलेली असते. त्याप्रमाणे एकुणएक सगळ्या मुलामुलींनी उपक्रम पूर्ण केला. प्रचंड आनंद झाला.

हुळहुळते खांदे आपल्याच हाताने चोळत पाचच्या सुमारास आम्ही गड उतरू लागलो. खाली आल्यावर एकाच्या डोक्यात आले की अलिबागला चालत चालत जाऊया. नको ती एस टी. सगळ्यांचा जोरात होकार. सर जरा नाखूष होते, पण विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून ते ही रुकार देते झाले. कधी या रस्त्यावरून आपण चालत जाऊ ही कल्पनाही केली नव्हती. मजेत चालताना वाटेत बैलगाडी दिसली, जवळच्या गावात जाणार होती. गाडीवान म्हणाला, बसा तिथं सोडतो तुम्हाला. झालं, शक्य तेवढ्या मुली बसलो लगेच. इतकी वर्ष अलिबाग मध्ये राहिल्यावर बैलगाडीत बसण्याचा पहिलावहिला अनुभव इथे घेतला. जाम भारी वाटले. त्यांचे वळण आल्यावर उड्या मारून परत रस्त्यावर . अंतर काही फार नव्हते पण रमतगमत, संध्याकाळच्या आल्हाददायक वातावरणात केलेली ती सफर मनात कायम घर करून राहिली. मित्र मैत्रिणींबरोबर घालवलेला हा उनाड दिवस आम्ही कोणीच कधी विसरलो नाही. ••

# कान्हा सद्गुरू!

कान्हा, सद्गुरू म्हणून त्याचे श्रेष्ठत्व कवीने प्रस्तुत कवितेत वर्णन केले आहे. असंख्य शास्त्रे शोधित असता अशा असत्य भांडारी कवीला सत्य कसे गवसणार असे कवीने प्रश्न केला आहे. त्यामुळेच त्याच्या व्याकूळ मनास पळभराची शांती मिळाली नाही. विश्व रहस्य जाणून घेण्यासाठी मन तळमळ करीत राहिले होते. अगणित कष्ट प्रतिदिनी कवीचे मन सहन करीत होते. असा बराच काळ देशांतरी भटकंती करण्यात लोटला, मग एके दिवशी यमुनातीरी एक वृद्ध भेटला, हाती दंडा घेऊन स्वतःच्याच नादात चालत होता, त्याचे प्रसन्न मुख, आणि तेजःपुंज डोळे, डोक्यावर केसांच्या जटा बांधल्या होत्या, शुभ्र दाढी होती, ते सर्व पाहून कवीने त्यास नमून आदरपूर्वक वंदन केले.






त्याचेबरोबर चालत त्याच्याशी अनेक विषयांवर चर्चा केली. कवीच्या मनीचे इप्सित त्यांना कळले होते. आनंदाने त्यांनी म्हटले, 'ध्यास लागला आहे रात्रंदिन तुझ्या मनाला तो तेजस्वी राजा राहतो शांतपणे त्याच्या सदनी, राजकुळातील उच्च कोटीत त्याचा जन्म झाला आहे. उत्तर, प्रांतात मथुरा नगरीत तो शासन करीत आहे, तू जर त्याला शरण गेलास तर तो तूला सत्य काय ते प्रेमाने सांगेल. एवढे ऐकल्यावर कवी तसाच मथुरा नगरीस जातो. कृष्ण नृपाकडे, विनम्रतेने त्यांस नाव, गाव, हेतू सगळे सांगतो. राजाचे सळसळते तारुण्य, मदनाचे रूप राजाला शोभून दिसत होते, असे राजाचे वर्णन कवीने केले आहे.

**'कृष्णगान'**

**शशिकांत मुद्देबिहाळकर**

**९७६७१५२६०८**

काय, करावे? कसे करावे? म्हणजे नगरीचे रक्षण होईल या चिंतेत राजा होता. तथापी गायन गाणे, खेळ खेळणे, या सर्व गोष्टी चालूच होत्या.

हे पाहून मात्र कवीच्या मनी राग आला. यमुना नगरी जो वृध्द भेटला त्याचा कवीला इतका राग आला की त्याला ठार मारून टाकावे असे क्षणभर कवीच्या मनात आले. कान्हा राजाचे राज्य, तर इवलेसे आहे त्याला राज्याची चिंता लागून राहिली आहे, मग मला लागलेली चिंता हा दूर करील असे मी कसे म्हणावे हा प्रश्न कवीला पडला. वैविध्याने नटलेल्या विश्व रहस्याला कोणी ऋषी तापसीही जाणू शकले नाही हे दुःख घेऊन मी रहातोय, अशी कवीची भावना झाली. पण मग एके दिवशी एकांतात हात धरून राजाने नेले, ईश्वराची कृपा तुझ्यावर असो असे म्हटले आणि अध्यात्मिक सत्य तुला उलगडून सांगतो असे सांगितले. मन स्थिर ठेवण्यास सांगून कसलीही शंका मनात आणू नकोस असे बजावले.

एकदा ''मी'' पण आणि अहंभाव गळून पडला की विश्वाचे शाश्वत सत्य तू जाणशील असे सांगितले.

शुद्ध ज्ञान हेच शाश्वत सत्य आहे, त्यांचे तेज चंद्र चांदण्या समान शितल आहे, त्याचे चिंतन तू पूर्ण मनोभावे करशील तर शाश्वत सत्याचे विश्वरूपाचे ज्ञान तूला प्राप्त होईल.

विश्व निर्मिती हा खरंतर खेळ आहे नृत्य गायनाचा, म्हणजेच आनंद प्राप्त करण्याचा, हे मनोमनी तू जाणून घे, जी शास्त्रे, वचने, विश्वाला माया म्हणतात ती सर्व खोटी असून, मुर्खपणाची आहेत, तू त्यांचा धिक्कार कर, सर्वव्यापी सागरावरील बुडबुड्यांसमान हे विश्वामधील जीवन आहे, जग सारे ज्ञानरूपी आहे, एकत्वाचीच ही सर्व रूपे आहेत.

आपल्या कर्माला जाणून घ्यावे हेच सोपे ज्ञान आहे. कर्मामध्ये नेहमी झोकून देऊन कर्म करावे, जगताचे राज्य सर्वांनीच सोबत भोगावे, जे गर्विष्ठपणे वर्तन करतात किंवा ईश प्रसादाने, जगत पित्याचा भोग भोगतात त्यांच्यापासून ईश्वर, ऊर्जा देऊन सज्जनांचे चिंतेतून हरण करील, आणि त्यांचे जीवन सुखमय होईल. जे सत्य नितीच्या मार्गावरून कधीच ढळत नाहीत व जे सर्वदा जन कल्याणाचा ध्यास घेतात, ज्यांना कधीही नारीचा मोह होत नाही, किंवा संपदेचाही मोह नाही, कला काव्यही ज्यांच्या मनी स्पर्श करीत नाही, दुसऱ्याचे दुःख पाहून ज्यांच्या मनात सल उठते, अशा माणसांना जे जे त्यांना लाभते ते ते इतरांचे होते. त्यांना अरण्यवास घडतो, त्यांच्या पदस्पर्शाने जणू त्यांना दुसरा स्वर्गच लाभतो.

शेवटी कवीला सद्गुरू सांगतात की तुला ज्ञानी लोकांचे सर्व सद्गुण कथिले आहेत. त्यामुळेच तूला या गुढ विश्वाचे ज्ञान प्राप्त होवो, आपल्या गोड वाणीने कृष्ण गुरूंनी हे सर्व सांगितल्यावर सत्य काय ते कळून आले असे कवी म्हणतो. दुःख कधी विरून गेले ते कळलेच नाही, आणि ज्ञान रवीची ज्योत केंव्हा तळपू लागली हे ही कवीला समजले नाही.

दिव्य ज्ञान प्राप्त झाल्याचा, आणि शाश्वत सत्याचे नाट्य पाहून कवी भारावून जातो. सद्गुरू कान्ह्याचे त्यास दर्शन घडते. शाश्वत विश्वाचे रहस्य त्यास सद्गुरू कृपेने उमगते. इथेच ही कविता संपन्न होते. तात्पर्य सत्याची कास धरून मार्गक्रमण करणे, अनितीचा त्याग करणे हेच विश्वरूप रहस्य आहे हे कान्हा सद्गुरू म्हणून कवीस आपल्या रसाळ वाणीने समजावून देतो.

**(कवी प्रा. श्रीप्रकाश अधिकारी)**

# 'गणेशकोंडीवरचे गाऱ्हाणं'





गणेश मूर्ती विसर्जनाच्या जागेला 'गणेशकोंड' म्हटले जाते. त्या क्षेत्राचे गावी पावित्र्य पाळले जाते. तिथली स्वच्छता, हिरवागार नयनरम्य परिसर, वाहते खळाळणारे स्वच्छ निळेशार पाणी, लोकांचे कमालीच ऐक्य, सामंजस्य अवर्णनीय असते. पण कालपरवाची गोष्ट गणेश कोंडीवर गाड्यांच्या वर्दळीच्या गर्दीत रस्त्यावर ट्रॅफिक फुल्ल होण्याच्या क्षुल्लक कारणावरून वाद झाल्यानंतर एका कॉलेजकुमाराच्या एका बुजुर्गाने नाहक कानशिलात वाजवली. चूक कोणाची होती हा विषय महत्त्वाचा नाही. पण खरंतर बाप्पाच्या विसर्जनाच्या वेळी सर्वजण आनंदोत्सव साजरा करत असतो अशा वेळी तरुणाईला अपमानित करून आनंदावर विरजण टाकणे कितपत योग्य होते? दीन दुबळ्या दुर्बल घटकांना धमकावणे, मारणे सोपे असतं. कारण त्यांचा जाब विचारण्यासाठी कोण येत नसतं. ताकतवानाशी असं करण्याची हिंमत दाखवायला हवी. त्या तरुणाच्या मनात आपल्या अपमानाची ही गोष्ट कायम सतावत राहणार नाही का?

खरंतर त्या मुलाचा बाप हयात असता तर जागच्या जागी परतफेड केली असती. आई बिचारी कुठेकुठे घरकाम करुन संसार चालवते. पण कोणीच वाली नसल्यासारखे गरीब मुलांवर हात उगारणाऱ्यांनी आईबाप असणाऱ्या बिघडलेल्या मुलांबद्दल अवाक्षर बोलण्याची हिंमत होणार नाही. अर्थात चूक झाली असेल तर ही गोष्ट समजावून सांगता आली नसती का? पण आपण दुसऱ्याच्या मनाचा विचार करीत नसतो. सणासुदीचे उत्सवात असे प्रकार घडू नयेत. संस्कृतीने नटलेला आपला देश.

**श्री.धनंजय शेटये**

कोकणातील गणेशोत्सव म्हणजे एक भक्तीमय महापर्वणीच असते. अखंड कोकण गणपती बाप्पाच्या नामाच्या जयघोषाने मंत्रमुग्ध झालेले असते. घराघरात धुप अगरबत्तीचा सुगंध दरवळत असतो. पाणंदीच्या निमुळत्या प्रवेशद्वारावर बांधलेल्या लाऊडस्पिकरच्या भोंग्यातुन प्रल्हाद शिंदे, अजित कडकडे यांची अजरामर गाणी दिवस रात्र वातावरणात एक आल्हाददायक प्रसन्नता निर्माण करीत असतात. घरचं वातावरण एखाद्या मंदीरासारखे भक्ती रसात न्हाऊन निघते. विसर्जनाच्या दिवशी नाहक हूरहूर लागून राहते. बाप्पाला निरोप घेण्याचा क्षण अगदी बालपणापासून आता पन्नाशीत पोहचेपर्यंत डोळ्यात पाणी आल्यावाचून कधी गेला नाही. विसर्जनाच्या दिवशी संध्याकाळी ती गणपतीच्या आसनांची रिक्त जागा पाहून बालपणी धाय मोकलून रडायचं. त्या दिवशी जीवनातल काही तरी खूप मोठं हरवल्यासारखं व्हायचं जेवणावरचं लक्ष उडायचं. कशातही मन लागत नसायचं. गणपतीच्या पाटाला वर्षभर कधी चूकून पाय लागला तरी चुकल्याचुकल्यासारखे, अपराध केल्यासारखे वाटायचे. एवढी श्रद्धायुक्त घरचं वातावरण असायचं. गणेशकोंडीवर विसर्जनाच्या दिवशी वाडीतील अनेक गणपती रांगेत बसवले जायचे. माझे बाबा परंपरागत पण खणखणीत आवाजात सामुदायिक गाऱ्हाणं घालायचे. गाऱ्हाणं बोलण्याची बाबांची एक एक विलक्षण शैली होती, खासियत होती. कोकण पट्ट्यात विशेषतः घाडी समाज गाऱ्हाणं घालण्यात पटाईत असायचे पण बाबांसमोर त्यांनाही बाबांची प्रभावी शब्दरचना फिकी पाडायची. भारदस्त आवाजात गाऱ्हाणं असायचं. गाऱ्हाणं ऐकताना मन भरून यायचं. प्रत्येकाच्या मनातील इच्छा, आकांक्षा बिनदिक्कतपणे बाप्पाच्या विसर्जनासाठी चाललेल्या मूर्तीसमोर मांडल्या जायच्या. दरवर्षी नवस फेडले जायचे म्हणजे बाप्पा सर्व इच्छा पूर्ण करायचा. आजच्या काळात ते गाऱ्हाणं बाजूला सारून वादावादीची गाऱ्हाणी ऐकायला मिळू लागली. बऱ्याच जणांचे नवस बोलण्यासाठी तर कधी बोललेला नवस फेडण्यासाठीचं गाऱ्हाणं असायचं. गाऱ्हाण्याची प्रचिती अनुभवलेले लोक श्रद्धेने नवस फेडायचे. गणेश कोंडीवरचं गाऱ्हाणं कडक समजलं जायचं. हळुहळु गणराय निर्माल्याच्या सर्व वस्तू इथंच सोडून मातीत मिसळून मातीत एकरुप होण्यासाठी सज्ज झाले होते. दहा बारा दिवसांचा उत्सव खूप काही सांगून जातो. आपण आपली अरेरावी, अहंकार, स्वार्थ, अहंमपणा असा किती दिवस ठेवावा? देवाचा देव विसर्जनाच्या वेळी सर्व मातीत मिसळून जातो. आपला अहंकार असा कधी मातीत मिसळून जाणार? पण आज बाप्पांच्या जाण्याने मन चिंतेत होतं आणि त्या निष्पाप तरुणाईचा झालेला अपमान घर करुन राहिला होता. ••

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)